रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १७२ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २० नोव्हेंबर २०२४

किंमत ४ ₹

# आज मतदान








(छायाचित्र - समीर मालोदे)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघातील मतदान बुधवारी (दि.२०) सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळेत होणार आहे. २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीच्या रिंगणात ७३ उमेदवार आहेत. अलिबाग विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या रिंगणात १४ उमेदवार असले, तरी महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील, शिंदे गटातील उमेदवार महेंद्र दळवी आणि अपक्ष उमेदवार यांच्यापैकी कोणाला मतदारांचा कौल मिळतोय याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे. यामध्ये युवा, महिला व ८५ वर्षावरील ज्येष्ठ मतदारांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

पान ५ वर

## ४९ केंद्रांवर वॉकीटॉकीचा वापर

जिल्ह्यातील ४९ केंद्रांवर इंटरनेट व इतर सुविधांचा अभाव आहे. मोबाईल फोन लागणार नाहीत. त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी वॉकीटॉकी, पोलीस वायरलेस आणि सॅटेलाईटचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

| मतदारसंघ | उमेदवार | मतदार |
|---|---|---|
| १८८ पनवेल | १३ | ६ लाख, ५२ हजार,०६२ |
| १८९ कर्जत | ०९ | ३ लाख, १८ हजार, ७४२ |
| १९० उरण | १४ | ३ लाख, ४२ हजार, १०१ |
| १९१ पेण | ०७ | ३ लाख, ०७ हजार, ९७९ |
| १९२ अलिबाग | १४ | ३ लाख, ०६ हजार,२३० |
| १९३ श्रीवर्धन | ११ | २ लाख, ६५ हजार, २८६ |
| १९४ महाड | ०५ | २ लाख,९६ हजार, ३८८ |
| एकूण | ७३ | २४ लाख, ८८ हजार, ७८८ |

## पराभवाच्या चिंतेमुळे विरोधकांकडून

# शेकापचे खोटे पत्र व्हायरल

### अफवांवर विश्वास ठेऊ नये; जयंत पाटील यांचे आवाहन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

सध्या निवडणूकीमुळे संपूर्ण वातावरण तापलं आहे. रायगड जिल्ह्यात शेकापला वाढता प्रतिसाद, सभांना होणारी गर्दी यामुळे विरोधकांना पराभवाची चाहूल लागली आहे. रायगड जिल्ह्यात पनवेल, उरण, पेण व अलिबागमध्ये शेकापने उमेदवार उभे केले असून उरण तसेच पेणमध्ये शेकापच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. मतदारांनीही प्रीतम म्हात्रे तसेच अतुल म्हात्रे यांना पसंती दिली आहे. त्यामुळे भाजपच्या उमेदवारांना पराभव दिसू लागल्याने त्यांनी शेकापचे खोटे पत्र व्हायरल करुन मतदारांना भाजपला मतदान करण्याचे आवाहन केले आहे. भाजपने हा रडीचा डाव केला आहे. या प्रकरणात ज्यांनी खोटे पत्र तयार करुन मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांच्यावर पोलिसांनी फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्याची मागणी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केली आहे.



> विरोधकांनी जो खोडसाळपणा केला आहे, त्यावर पेण व उरणमधील शेकापचे कार्यकर्ते, मतदार, हितचिंतकांनी विश्वास ठेऊ नये. विरोधकांना पराभव स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे त्यांनी हे गलिच्छ कृत्य केले आहे. याचे मुख्य सुत्रधार उरणचे भाजप आ. महेश बालदी असल्याचा संशय असून पोलिसांनी आरोपींवर तात्काळ कारवाई करुन त्यांना अटक करावी. तसेच ज्यांनी हे पत्र व्हायरल केले आहे, त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी.
> –जयंत पाटील, सरचिटणीस, शेकाप

मतदानाच्या पुर्वसंध्येला विरोधकांनीगलिच्छराजकारणकेले आहे. पेण व उरणमधील शेकापचे विजयी उमेदवार अतुल म्हात्रे व प्रीतम म्हात्रे या दोघांची उमेदवारी रद्द करुन भाजपच्या उमेदवारांना शेकापने पाठिंबा दिल्याचे खोटे पत्र विरोधकांनी व्हायरल केले आहे. या लेटरहेडवर दहा वर्षापूर्वीचे पदाधिकारी आहेत. त्यातील काही आज आपल्यामध्येही नाहीत. असे लेटरहेड वापरुन त्यांनी खोटे पत्रक तयार केले आहे. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. पक्षाचे कार्यालयीन चिटणीस ॲड. राजू कोरडे त्याबाबतची कार्यवाही करीत आहेत, अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली.

पक्षाच्या अधिकृत उमेदवाराबाबत सर्वसामान्य मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होईल, तसेच पक्षाची जनसामान्यांमध्ये बदनामी करण्याच्या हेतूने हे कृत्य केले असून उरणमधील भाजपचे उमेदवार महेश बालदी व पेणचे उमेदवारी रविशेठ

पान ५ वर

# राज्यभरात ८२७२ उमेदवार रिंगणात

। मुंबई । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली असून, आता २८८ जागांसाठी ८२७२ उमेदवार रिंगणात आहेत.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, १०,९०० अर्ज दाखल झाले होते. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची उत्सुकता अधिकच तीव्र होत आहे. राजकीय पक्ष आपापल्या राजकीय आघाड्या मजबूत करण्यात व्यस्त आहेत. दरम्यान, सोमवारी (दि.४) दुपारी तीन वाजता उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली. आता कोणत्याही उमेदवाराला अर्ज मागे घेता येणार नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी आता ८२७२ उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी यावेळी एकूण १०९०० उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १६५४ उमेदवारांचे अर्ज फेटाळण्यात आले, तर ९२६० उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आले.



त्यापैकी ९८३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. या सर्व प्रकारानंतर आता ८२७२ उमेदवार उरले असून, त्यांच्या भवितव्याचा फैसला २० नोव्हेंबरला ईव्हीएममध्ये होणार आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा जागांवर मतदान होणार आहे, त्याचा निकाल २३ नोव्हेंबरला जाहीर होणार आहे.

## माथेरान येथील दोन तरुणांचा अपघाती मृत्यू



। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात राहणारे सहा तरुण सोमवारी (दि. १८) खोपोलीजवळील साजगाव येथील यात्रेसाठी गेले होते. रात्री साडेअकराच्या सुमारास तीन जण एकत्र दुचाकीवरुन जात होते. दरम्यान, महड फाट्यापासून पुढे खालापूरकडे जात असताना त्यांची मोटारसायकल टेम्पोला धडकली. पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात जखमी झालेल्या तीनपैकी दोन तरुणांचा मृत्यू झाला असून, एक अत्यवस्थ आहे.

माथेरान शहरातील दर्शन वेताळ, अजय आखाडे, प्रथमेश सोनावणे असे तिघे एमएच ४६ सीएस ४०६६ या स्कूटीवरून साजगाव यात्रेसाठी १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी निघाले होते. त्यांच्यासह माथेरानमधील आणखी तीन तरुणदेखील दुसऱ्या

पान ५ वर

# दळवींच्या मनमानीमुळे महायुतीत वाद

### आमदार दळवींना निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महायुतीचे उमेदवार म्हणून आ. महेंद्र दळवी निवडणुकीच्या रिंगणात आहेत. परंतु, त्यांच्या मनमानी कारभारामुळे महायुतीमध्ये अंतर्गत वाद सुरु झाले असल्याची चर्चा सुरु आहे. दळवींवर अनेक कार्यकर्ते नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. त्याचा फटका या निवडणुकीत दळवींना बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

अलिबाग, मुरूड व रोहा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या पंधरा दिवसांपासून प्रचार करण्यात आला. आरोप-प्रत्यारोप एकमेकांवर करण्यात आले. दरम्यान, महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांची लढत महाविकास आघाडी पुरस्कृत चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्यासोबत आहे. प्रचारात चिऊताई यांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मतदारांच्या

पान ५ वर

> दळवींच्या भूमिकेबाबत नाराजीचे सूर उमटत आहेत. तत्कालिन भाजप जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनीदेखील दळवींवर विश्वास नसल्याचे भाषणातून उदाहरणासहित व्यक्त केले होते. दळवींवरील रागामुळेच त्यांना पक्ष विरोधी भूमिका घ्यावी लागली होती.

# खानावमधील पिता-पुत्राला दळवींचा दम?

। अलिबाग । प्रतिनिधी ।

निवडणुकीत ६० हजारांचा लीड घेण्याच्या बाता आमदार दळवी यांनी अनेक प्रचार सभांमधून मारल्या. परंतु, प्रचारादरम्यान त्यांना मतदारांचा प्रतिसाद दिसून आला नाही. त्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली असून, पराभवाच्या भीतीने चौताळले आहेत, अशी चर्चा आहे. त्यामुळे सतत दळवींचे खबरी म्हणून काम करणाऱ्या खानावमधील एका बड्या नेत्यासह त्याच्या पुत्राला मते न मिळाल्यास थळमध्ये यायचे नाही, अशी तंबीच आमदार दळवींनी भरली असल्याची चर्चा असून, खानाव परिसरातील गावागावात या चर्चेला उधाण आले आहे.

> ■ खबऱ्याची भूमिका बजावणाऱ्या बापलेकावर आली पश्चातापाची वेळ

खानावमधील हा बडा नेता गेली काही वर्षे काँग्रेसमध्ये होता. खानाव ग्रामपंचायतीवर असलेली एकहाती सत्ता तेथील निलेश गायकर या नेतृत्वाने हिसकावून घेतली. त्यामुळे त्या नेत्याचे खानावमधील अस्तित्व कमी होऊ लागले होते. आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी काँग्रेसला राम राम करीत थळमधील दळवींचे घर गाठले. गेल्या दोन वर्षांपासून ते आमदार दळवींचे फॅन झाले आहेत. दळवींच्या वेगवेगळ्या कार्यक्रमात ते पुढे असायचे.

पान ५ वर

## उरण नगरपालिकेकडून थाटामाटात उद्घाटन

# कार्यालय बनले श्वानांचे आश्रयस्थान

। उरण । वार्ताहर ।

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या काही दिवस आधी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उरण नगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या सुसज्ज इमारतींचा लोकार्पण सोहळा काही दिवसांपूर्वी मोठ्या थाटामटात संपन्न झाला होता. उद्घाटन होऊन दीड ते दोन महिने होण्यास येऊनही अद्यापपर्यंत नवीन वास्तूमध्ये कार्यालय सुरू झालेले दिसत नाही. सदरची नवीन वास्तू ही कुत्र्याचे आश्रयस्थान बनली असल्याची चर्चा जनतेत सुरू आहे. सदरचे बांधकाम ही निकृष्ट दर्जाचे असल्याचे समजते.



उरण नगरपालिका हद्दीतील अनेक विकासकामांचे उद्घाटन काही दिवसांपूर्वी मोठ्या थाटामटात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले होते. तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले होते. या उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी मोठमोठ्या वल्गना करीत आपली पाठ आपणच थोपटून घेतली होती. त्यावेळी येथील जनतेला आपला पक्ष

पान ५ वर

> नगरपालिकेच्या नवीन कार्यालयाचा लोकार्पण सोहळा काही दिवसांपूर्वी होऊनही अद्याप पर्यंत नवीन वास्तूत कार्यालय सुरू झालेले नाही. सदरचे कार्यालय धूळखात पडले असून अद्याप आतील काम अपूर्ण असल्याची माहिती अधिकारी वर्ग देतात. मात्र सदरची नवीन वास्तू ही कुत्र्यांचे आश्रयस्थान बनली असल्याचे चित्र पहावयास मिळत असल्याने जनतेत नाराजीचा सूर निघत आहे.






# परप्रांतियांच्या मतांचा गठ्ठा कुणाच्या पारड्यात?

**। कणकवली । वृत्तसंस्था।**

**परराज्यांतून नागरिक कोकणात मोठ्या प्रमाणात वास्तव्याला येत आहेत. वर्षानुवर्षे स्थायिक झालेले परप्रांतीय दक्षिणेकडील होते. परंतु, आता उत्तरेकडीलही परप्रांतीयांची संख्या कमालीची वाढली आहे. आता वाढलेला हा परप्रांतीयांच्या मतांचा गठ्ठा कुणाच्या पारड्यात पडणार, यावरही निकाल अपेक्षित आहे. परप्रांतीयांचा प्रत्येक व्यवसायातील प्रवेश हे स्थानिक व्यावसायिक आणि बेरोजगारांच्या रोजगारावर गदा आणणारे ठरत आहेत.**



सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये तिन्ही विधानसभा मतदारसंघांत जोरदार लढत अपेक्षित आहे. किंबहुना तशी लढत सध्या सुरू आहे. बुधवारी (दि. २०) मतदान होईल. मात्र, या खऱ्या अर्थाने एकगठ्ठा मत कोणाच्या पारड्यात पडणार, यालाही फार महत्त्व आहे. किमान तशी चर्चा रंगत आहे. कोकणात परप्रांतीयांना थारा देऊ नका, असे समाजमाध्यमांतून सांगितले जाते. मात्र, व्यवसायासाठी स्थायिक झालेले परप्रांतीय जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव टाकणारे ठरणार आहेत. कोकणात सुरुवातीच्या काळात दक्षिणेकडील नागरिक दाखल झाले. वाहनांचे टायर पंक्चर काढणे हा व्यवसाय केरळ राज्यातील अनेकांनी कोकणात सुरू केला. याशिवाय, केरळची मंडळी बेकरी व्यवसायामध्येही कोकणात उतरली. त्यानंतर, चिरेखाण व्यवसायामध्ये कर्नाटकातील बहुतांश नागरिक हे मजुरीसाठी कोकणात आले. अनेक जण आता येथे स्थिरावले आहेत.

**त्यामुळे परप्रांतांबरोबरच नेपाळचा नागरिक पुढच्या काळामध्ये कोकणातला रहिवासी झाला तर नवल वाटू नये, अशी स्थिती सध्या आहे. गेल्या काही वर्षांपासून बेकरी, हॉटेल, हार्डवेअर, कापड विक्री, कटलरी व्यवसाय, वाळू उत्खनन, मासेमारी आणि मासेविक्री अशा व्यवसायामध्ये स्थिरावलेला हा परप्रांताचा नागरिक कोकणात आता मतदार झाला आहे. या मतदारांचा प्रभाव हा कुणाच्या पथ्यावर पडणार, यावर बरेच काही अवलंबून राहणार आहे. प्रत्येक गावामध्ये एक-दोन टक्के हा मतदार असले तरी ते उमेदवारांच्या मतांमध्ये भर टाकणारे ठरणार आहेत. याचा लाभ ठराविक उमेदवारांना निश्चितपणे होईल, अशी चर्चा आहे. या मतदारांना गोंजारण्यासाठी बैठकाही घेतल्या आहेत. आता, त्याचा प्रभाव या परप्रांतीय मतदारांवर किती पडणार, हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.**

चिरेखाण व्यवसाय असलेल्या आणि वाहतूक होणाऱ्या शहरांमध्ये अशा कर्नाटक मजुरांच्या वसाहती उभ्या राहिल्या आहेत. आता, ते कोकणातले कायमस्वरूपी नागरिकही झाले आहेत. त्यांच्याकडे मतदानाचा हक्क आहे. अशाच पद्धतीने हार्डवेअर व्यवसायासाठी आलेले गुजराती समाजातील अनेक नागरिक गावागावांपर्यंत जाऊन स्थिरावले आहेत. उत्तर भारतीयांचा भरणा हा अलीकडच्या कालावधीमध्ये झाला आहे. ज्या वेळेपासून शहरी भागांमध्ये इमारतींचे बांधकाम वेगाने सुरू झाले. त्यामध्ये उत्तर भारतीय मजुरीसाठी आले आणि आता ते कोकणामध्ये बांधकाम व्यावसायिक झाले आहेत.

अनेकांनी स्वतःच्या इमारतीही उभारल्या आहेत. मासेमारी, वाळू व्यवसाय असो, अनेक परप्रांतीय आता येथे स्थायिक झाले आहेत. स्वतःच्या कुटुंबासाठी येथे त्यांनी निवास व्यवस्थाही केली आहे. या परप्रांतातील नागरिकांची स्वतंत्र मंडळे आहेत. गुजराती समाज नवरात्री उत्सवात प्रत्येक शहरात स्वतःचा वेगळा गरबानृत्य कार्यक्रम करतात. या समाजाने मोठी सभागृहे आणि मंदिर उभारले आहे.

शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये आजवर मराठी माध्यमाच्या शाळा होत्या. अशा मराठी माध्यमाच्या शाळांमध्येही परप्रांतीय मुले शिकत होती. पण, आता त्यांना इंग्रजी माध्यमाचा पर्याय गावागावांतही उपलब्ध झाला आहे. त्यामुळे हिंदी भाषक राज्यातील मजूरदार असो किंवा मोठे व्यवसाय हे स्थिरावल्यानंतर येथे इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये त्यांची मुले शिक्षण घेत आहे. असा हा उत्तर भारतीय गुजराती आणि दाक्षिणात्य नागरिक कोकणात स्थिरावला आहे.

## अंमली पदार्थांचे तस्कर, पिस्तूलांचा सुळसुळाट

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**

सध्या विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरु असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रयत्न करीत आहेत. मात्र, शहरातील गुन्हेगार, अंमली पदार्थ तस्कर आणि पिस्तूलांचा वापर करणाऱ्या टोळ्या सक्रीय झाल्या आहेत. या गुन्हेगारांच्या टोळ्यांकडून पिस्तूल जप्त करण्यात येत असून तस्करांकडून लाखोंचे अंमली पदार्थ जप्त करण्यात येत आहे. गेल्या चार दिवसांत चार आरोपींकडून पिस्तूल आणि चार आरोपींकडून एमडी पावडर जप्त करण्यात आली आहे.

पहिल्या घटनेत, कारमधून अंमली पदार्थाची तस्करी करताना गुन्हे शाखा पोलिसांनी दोघांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून १२ लाखांचे अंमली पदार्थ आणि देशी बनावटीची पिस्तूल पोलिसांनी जप्त केली. ही कारवाई सोमवारी सकाळी सात वाजता नंदनवनमधील व्यंकटेशनगरातील एनएआयटी क्वॉर्टरजवळ केली. राजू गिरी ऊर्फ दुपेंद्र चमन गिरीगोसावी आणि साहिल महेश सोळंकी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तर भाविक निवृत्ती महाजन फरार आहे.

मुंबईतून एमडी नावाचे अंमली पदार्थ आणून नागपुरात विक्री करणाऱ्या टोळ्यांची संख्या वाढली आहे. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल हे ड्रग्ज फ्री सीटीफ अभियान राबवत आहेत. मात्र, काही पोलीस कर्मचाऱ्यांचे एमडी तस्करांशी संबंध असल्यामुळे अभियानाला यश मिळत नसल्याचे सत्य समोर आले आहे. अशातच मुंबईवरुन दोन एमडी तस्कर नागपुरात आल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. सोमवारी सकाळी सात वाजता व्यंकटेशनगरातील रस्त्यावर पोलिसांनी सापळा रचला. काही वेळातच संशयित कार आली. पोलिसांनी कारला थांबवले.

कारमधून आरोपी राजू गिरी आणि साहिल सोळंकी या दोघांना ताब्यात घेतले. कारची तपासणी केली असता कारमधून ५९ ग्रॅम एम डी पावडर आणि देशी बनावटीची पिस्तूल आढळून आली. पोलिसांनी वाहनासह १२ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. काही अंतरावर ड्रग्ज खरेदी करणारा आरोपी भाविक महाजन हा पोलिसांना बघून पळून गेला.

### पिस्तूल आणि काडतुसासह गुंडाला अटक

**शहरात पिस्तूल आणि काडतुसासह फिरणाऱ्या गुंडाला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून दोन काडतूस, पिस्तूल तसेच दुचाकी असा एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तहसील पोलिसांनी ही कारवाई केली. शुभम सुनील महल्ले असे या आरोपीचे नाव आहे. तसेच दोन दिवसांपूर्वी पोलिसांनी अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या दोघांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून एक पिस्तूल आणि एमडी ड्रग असा एकूण १० लाख १८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मोहसीन शाह यासीन शाह आणि ऋषी चैनसुख राठोड अशी आरोपींची नावे आहेत. गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून एका युवकाला अटक करुन त्यांच्याकडून पिस्तूल जप्त करण्यात आली. ही कारवाई कुवारा भीमसेन मंदिर चौक, खलासी लाईन मोहन नगर नाल्याजवळ करण्यात आली. मिलन यशवंत सूर्यवंशी असे आरोपीचे नाव आहे. डॉमिनिक सॅमसंग अलेक्झेंडर (२५ मकरधोकडा, गिट्टीखदान) याच्याकडून विकत घेतल्याचे सांगितले.**

## मतदान केंद्रावर मोबाईलला मनाई

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मतदान केंद्रावर मोबाईलचा दुरुपयोग होईल, असा दावा निवडणूक आयोगाने केला होता. उच्च न्यायालयाने त्याला मान्यता देताना मतदान केंद्रावर मोबाईल नेण्याची परवानगी नाकारली आहे.

या निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिक तसेच वयोवृद्ध महिलांना मतदान केंद्रावर नातेवाईकांशी संपर्क साधता येत नाही. त्यामुळे त्यांची गैरसोय होते. तसेच ओळखपत्र व इतर कागदपत्रे मतदान केंद्रावर नेणे अडचणीचे असल्यामुळे डिजी लॉकर सेवेचा वापर करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी ॲड. उजाला यादव यांनी याचिकेतून केली होती. मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर याबाबतची सुनावणी झाली. आयोगाच्या वतीने ज्येष्ठ वकील आशुतोष कुंभकोनी यांनी युक्तिवाद करताना निवडणुका पारदर्शक, निष्पक्षपणे व सुरळीत पार पाडण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण दिले.

## एकनाथ खडसे घेणार राजकीय निवृत्ती?

**। जळगाव । वृत्तसंस्था ।**

जळगाव राष्ट्रवादीतून भाजपमध्ये प्रवेश करण्यासाठी काही महिने जोरकस प्रयत्न करुनही यश न आल्याने आमदार एकनाथ खडसे यांनी तो प्रयत्न सोडून राष्ट्रवादीतच राहण्याचा निर्णय घेतल्यावर महाविकास आघाडीने विरोधकांना तोंड देण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर विधानसभा निवडणुकीत टाकली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे खडसे यांनी आता राजकारणातून निवृत्त होण्याचे संकेत दिले आहेत.

भाजपमध्ये देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन यांच्याशी बिनसल्यानंतर खडसे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. राष्ट्रवादीने त्यांना विधान परिषदेवर संधी देत आमदार केले. परंतु, त्यानंतरही खडसे यांचे भाजपमध्ये परतण्याचे वेध कायम राहिले. लोकसभा निवडणुकीआधी त्यांनी मुंबईत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा यांचीही भेट घेतली होती. आपण भाजपमध्ये प्रवेश केला असल्याचा दावा त्यांनी तेव्हा केला असताना भाजपकडून कोणत्याच पदाधिकाऱ्याने त्यास दुजोरा दिला नाही. रावेर लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवार स्नुषा रक्षा खडसे यांचा प्रचारही त्यांनी केला. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादीतच राहणार असल्याचे जाहीर केले.

खडसे यांच्या कन्या रोहिणी यांना मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळाली आहे. याशिवाय जळगाव ग्रामीण, एरंडोल-पारोळा आणि जामनेरमध्ये शरद पवार गटाचे उमेदवार आहेत. शरद पवार गटाच्या चारही मतदारसंघांवर लक्ष ठेवण्यासह तेथील उमेदवारांसाठी सभा घेण्याचा प्रयत्न एकनाथ खडसे यांनी केला. याशिवाय महाविकास आघाडीतील मित्रपक्षांच्या उमेदवारांचा प्रचारही त्यांनी केला. तब्येतीच्या कारणावरून फार दगदग सहन होत नसल्याने पुढील निवडणूक मी पाहणार की नाही, ते परमेश्वर ठरवेल, असे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.

## माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक

**राजकीय वर्तुळात खळबळ**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या वाहनावर सोमवारी रात्री अज्ञात इसमांनी दगडफेक केली. त्यात देशमुख गंभीर जखमी झाले असून त्यांना काटोल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. नरखेड येथून प्रचारसभा आटोपून काटोलकडे परत जात असताना बेला फाट्यानजिक ही घटना घडली.

काटोल मतदार संघात अनिल देशमुख यांचे पूत्र सलील हे राष्ट्रवादीचे उमेदवार आहेत. प्रचाराच्या अखेरच्या दिवशी देशमुख दिवसभर मतदार संघात प्रचारात सक्रीय होते. संध्याकाळी त्यांची नरखेडमध्ये सभा होती. ती आटोपून कार्यकर्त्यांसमवेत ते कारने काटोलकडे निघाले होते. या दरम्यान बेला फाट्याजवळ काही अज्ञात इसमांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक केली. यात अनिल देशमुख हे गंभीर जखमी झाले असून त्यांना काटोलच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. या घटनेची चित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित झाली असून त्यात देशमुख यांच्या चेहऱ्यावर जखमा दिसून येत आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या वाहनाच्या काचा फुटलेल्या दिसून येतात.

या संदर्भात नागपूर ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधला असता त्यांनी घटना घडल्याचे सांगितले. परंतु, अन्य तपशील देण्यास नकार दिला. दरम्यान, या घटनेची माहिती कळताच राष्ट्रवादीचे शेकडो कार्यकर्ते रुग्णालयाजवळ एकत्र झाले होते. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. भाजपने ही स्टंटबाजी आहे, असा आरोप केला आहे. स्वत:च्याच कार्यकर्त्यांकडून देशमुख यांनी दगडफेक घडवून आणली, असा आरोप भाजपचे काटोल मतदार संघाचे प्रभारी अविनाश ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला आहे.

काटोलमध्ये सलील देशमुख यांच्याविरुद्ध भाजपचे चरणसिंह ठाकूर यांच्यात अटीतटीची लढत आहे. मतदानाच्या दोन दिवसांपूर्वी ही घटना घडल्याने राजकीय वर्तूळात खळबळ उडाली. माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात वाद मागील काही वर्षांपासून सुरु आहे. देशमुख मंत्री असताना त्यांच्यावर झालेले खंडणीचे आरोपाला भाजपची फूस होती, असा आरोप देशमुख यांनी यापूर्वीच केला आहे. या संपूर्ण घटनाक्रमावर त्यांनी एक पुस्तकही काढले आहे.

## मुंबईत ७६ क्रिटीकल मतदान केंद्र

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबईत यंदा कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीकोनातून एकही संवेदनशील मतदान केंद्र नसले तरी तब्बल ७६ मतदान केंद्रे ही क्रिटीकल स्वरुपाची आहेत. या मतदान केंद्रावर १० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान नोंदवले गेले आहे. अशी शहर भागात १३, तर उपनगरात ६३ मतदान केंद्रे आहेत.

मुंबईतील ७३ क्रिटीकल मतदान केंद्रे असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. मतदान केंद्रावर १० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान होत असल्यास किंवा एखाद्या मतदान केंद्रावर एकाच उमेदवाराला ९० टक्क्यापेक्षा अधिक मतदान होत असल्यास ते मतदान केंद्र क्रिटीकल समजले जाते. मात्र मुंबईत १० टक्क्यांपेक्षा कमी मतदान या एकाच निकषानुसार तब्बल ७६ मतदान केंद्रे ही क्रिटिकल असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

कुलाब्यातील नऊ क्रिटीकल मतदान केंद्रांपैकी बहुतांशी नौदलाच्या परिसरात आहेत. तसेच मुंबईच्या अन्य भागातील क्रिटीकल मतदान केंद्रांमध्येही नौदल किंवा सैन्याच्या अखत्यारितील मतदान केंद्रांचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यामुळे या परिसरात अनेकदा नोकरीनिमित्त स्थलांतरित झालेले नागरिक जास्त असतात. अनेक मतदार जहाजावर एक दोन महिन्यांच्या कालावधीकरीता गेलेले असतात. तर काही वेळा नौदलाच्या किंवा सैन्याच्या अखत्यारितील वसाहतींमध्ये निवडणूक निरीक्षकांना सुरक्षेच्या कारणास्तव सोडले जात नाही. अशा काही कारणांमुळे या परिसरात मतदान अतिशय कमी होत असल्याचे आढळून आले आहे.

**कुठे, किती मतदान केंद्रे क्रिटीकल**

| | |
|---|---|
| कुलाबा ९ | वांद्रे पूर्व ९ |
| चांदिवली ७ | दहिसर ७ |
| बोरिवली ६ | मागाठाणे ५ |
| विलेपार्ले ६ | घाटकोपर पश्चिम ५ |
| मानखुर्द शिवाजी नगर ५ | |

## निवडणूक कर्मचाऱ्यांच्या वाहनाला अपघात

**। जळगाव । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणुकीच्या एक दिवस आधी किनगाव येथे साहित्य घेऊन जात असलेल्या चार महिला कर्मचाऱ्यांच्या वाहनाला अपघात झाला. या अपघातात चार महिला कर्मचारी जखमी झाल्या असून, त्यांना चोपडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जळगाव येथून रावेर विधानसभा मतदारसंघात मतदान साहित्य घेऊन जाताना केंद्र अधिकारी म्हणून नियुक्ती असलेल्या शिक्षण विस्तार अधिकारी मीनाक्षी सुलताने, शिक्षिका ज्योती भादले, कविता बाविस्कर आणि लतिफा खान यांच्या वाहनाला अपघात झाला.

या अपघातात चारही महिला कर्मचारी जखमी झाल्याने त्यांना चोपडा येथे तातडीने हलविण्यात आले. संबंधित कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत जिल्हा प्रशासनाने काळजी घेतली असून, पर्यायी व्यवस्थेद्वारे मतदान साहित्य निर्धारित केंद्रांवर पोहोचविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

## घरोघरी मतदार ‘स्लीप’ वाटप अपूर्णच

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**

मतदारयादीतील नाव शोधण्यासाठी निवडणूक यंत्रणेने ऑनलाइन उपलब्ध करून दिलेली सुविधा, मतदान केंद्राचा शोध घेण्यासाठी वाढणारा मोबाईल ॲपचा वापर याचा थेट परिणाम यंदा मतदार स्लीप वाटपावर झाल्याचे दिसत आहे. मतदानाला अवघा एक दिवस शिल्लक असतानादेखील निवडणूक आयोगासह राजकीय पक्षाकडून केले जाणारे स्लीपचे वाटप अद्याप पूर्ण झालेले नाही.

घरोघरी मतदारांपर्यंत स्लीप पोचविण्याचे मोठे आवाहन प्रशासनासमोर आहे. व्होटर स्लीपच्या माध्यमातून प्रचाराच्या अंतिम टप्प्यात आणि अगदी प्रचार संपल्यानंतरही राजकीय पक्षांना मतदारांना भेटण्याची संधी मिळत होती. या कामामुळे मतदारांपर्यंत शेवटचा संदेश पोचला जात असल्याने राजकीय पक्ष उमेदवार खूष होते. मात्र, आता निवडणूक आयोगाने यावर निर्बंध घातले आहेत. लोकसभा निवडणुकीपासून आयोगाने ही संपूर्ण जबाबदारी स्वतःकडेच घेतली. प्रचाराची रणधुमाळी संपल्यानंतरही व्होटर स्लीपच्या माध्यमातून राजकीय पक्ष स्वतःचा प्रचार करीत असल्याचा आक्षेप घेत साध्या कागदावरील स्लीप वाटण्याचे काम निवडणूक आयोगाने आपल्या जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडे सोपविले खरे. परंतु गत लोकसभा निवडणुकीत अपुऱ्या मनुष्यबळामुळे आयोगाची चांगलीच तारांबळ उडाली होती.

शहर व ग्रामीण भागातील बहुतांश केंद्रांवर प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीच या स्लीपचे वाटप झाले होते. याचा त्रास मतदारांनाही सोसावा लागला होता. विधानसभा निवडणुकीत आयोगाने यात बदल करण्याची मागणी केली होती. मात्र ही मागणी फेटाळण्यात आली. निवडणूक आयोगातर्फे देण्यात येणाऱ्या स्लीपवर यंदा मतदारांचे छायाचित्र प्रसिद्ध केलेले आहे. शहरातील ६० ते ७० टक्क्यांहून अधिक मतदारांपर्यंत स्लीप पोचल्याचा दावा केला जात असला, तरी अनेक कुटुंबांपर्यंत निवडणूक आयोगाच्या स्लीप पोचलेल्या नाहीत.

## आचारसंहितेत कारवाई सुसाट

**। धाराशिव । वृत्तसंस्था ।**

- **१२ लाख ८४ हजारांचा गांजा जप्त**
- **७६ लाखांचा गुटखा**

निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत जिल्ह्यात पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करून जवळपास ७६ लाखांचा गुटखा, १२ लाख ८४ हजारांचा गांजा जप्त केला. याशिवाय दोन हजार १४४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली.

जिल्ह्यामध्ये पोलिसांनी अवैध धंद्याविरुद्ध विशेष मोहीम राबवून गोपनीय माहितीवरून ठिकठिकाणी छापा कारवाई करून मोठ्या प्रमाणात अवैध दारू, गुटखा, अमली पदार्थ, रोख रक्कम जप्त केली. अवैध अग्निशस्त्र, काडतूस, तलवारी, चाकू बाळगणाऱ्यांकडून शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

हॉटेल, ढाबे, दारूविक्री करणाऱ्यांच्या ठिकाणी झडती घेऊन दारूची चोरटी वाहतूक करणारे, देशी दारू, गावठी हातभट्टी, ताडीचे अड्डे उद्ध्वस्त करून विक्री करणाऱ्यांवर ३२१ गुन्हे दाखल केले. ६७ लाख नऊ हजार २६० रुपयांचा अवैध दारूचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जिल्ह्यात संशयित दुकानांची अचानकपणे झडती घेऊन गुटखा विक्री करणारे, गुटख्याची विक्रीसाठी चोरटी वाहतूक करणाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करून १२ गुन्हे दाखल केले. ७६ लाख ७४ हजार रुपयांचा तीन हजार ७८४ किलो गुटखा जप्त केला. जिल्ह्यात परराज्यातून विक्रीसाठी गांजाची तस्करी वाहतूक करणारे व अन्य अवैध अमली पदार्थ गांजा विक्री करणाऱ्यांवर चार गुन्हे दाखल करून १२ लाख ८४ हजार रुपयांचे ५२ किलो अमली पदार्थ जप्त केले.

जिल्ह्यातील विधानसभा निवडणूक शांततेत व भयमुक्त होण्यासाठी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार व संशयितांचा शोध घेऊन पाच अग्निशस्त्रे व २० तलवारी जप्त करुन शस्त्र अधिनियमाप्रमाणे २० गुन्हे दाखल करण्यात आले. जिल्ह्यातील अनेक दिवसांपासून मिळून न येणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन पकडण्यात आले.

जिल्ह्यात ३०० ठिकाणी रुटमार्चनिवडणूक बंदोबस्तकामी जिल्ह्यासाठी केरळ, राजस्थान येथून निमलष्करी दलाच्या मदतीने जिल्ह्यात ३०० ठिकाणी रुटमार्च करण्यात आला. निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने नाकाबंदी वाहन तपासणी दरम्यान ११ लाख ४८ हजार रोकड जप्त करुन कारवाई करण्यात आली.

**निवडणुकीसाठी रत्नागिरी जिल्हा प्रशासन सज्ज**

## १६६ मतदान केंद्रांवर सीसीटीव्हीद्वारे नियंत्रण

**। चिपळूण । वृत्तसंस्था ।**

चिपळूण विधानसभा मतदार संघातील मतदान प्रक्रियेची तयारी पूर्ण झाली आहे. मंगळवारी (दि. १९) सकाळी ७ वाजल्यापासून मतदान यंत्रे प्रत्येक मतदान केंद्रांवर पाठवण्यात येणार आहेत. एकूण ३३६ मतदान केंद्रांपैकी चिपळुणात १७० तर संगमेश्वर तालुक्यातील १६६ मतदान केंद्रांवर यंत्रे रवाना होतील. चिपळुणातील ११९ तर संगमेश्वरमधील ४५ मतदान केंद्रे सीसीटीव्हीच्या कक्षेत असणार आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी आकाश लिगाडे यांनी दिली.

येथील प्रांताधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद झाली. यावेळी प्रांताधिकारी लिगाडे म्हणाले, चिपळूण विधानसभा मतदार संघात एकूण २ लाख ७६ हजार ६५ मतदार आहेत. त्यापैकी १ लाख ३४ हजार ८१३ पुरुष तर १ लाख ४१ हजार १८३ महिला मतदार असून, ८५ वर्षांवरील ३ हजार ८१८ तर दिव्यांग १ हजार ७०३ मतदार आहेत. या वेळी ५ हजार १७ नवमतदारांनी नोंदणी केली आहे. चिपळूण मतदार संघातील ३६ मतदान केंद्रांवर कोणतेच मोबाईल नेटवर्क नाही. १६८ मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. आत्तापर्यंत ८३५ पैकी ७८६ लोकांचे होम व्होटिंग घेण्यात आले आहे. ३३६ मतदान केंद्रांवर ३३६ पोलिस व तेवढेच होमगार्ड असणार आहेत तर प्रत्येक मतदान केंद्रासाठी पाच कर्मचाऱ्यांच्या ३६४ टीम बनवण्यात आल्या आहेत.

मतदार संघात ९५.५७ टक्के व्होटर्स स्लिप वाटण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित लोकांना त्या लवकरच देण्यात येणार आहेत. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी सर्व मतपेट्या युनायटेड इंग्लिश स्कूलमध्ये आणण्यात येतील. त्या ठिकाणी २१ टेबल लावण्यात आले आहेत. त्या ठिकाणी मतदान यंत्र जमा केली जातील. रात्री १० वा. पर्यंत सर्व मतपेट्या दाखल होतील. त्यानंतर त्या स्ट्राँग रूममध्ये ठेवून स्ट्राँग रूम सील केले जाईल. मतदान यंत्रणा निर्भय व सुरक्षितपणे पूर्ण होण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून चोख तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी निर्भयपणे आपल्या मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी लिगाडे यांनी केले आहे.

### सखी मतदानसाठी ग्रीन बूथ

**लोकसभा निवडणुकीत शहरातील मुरादपूर येथील महाराष्ट्र हायस्कूलमधील सखी मतदान केंद्रात कोकणातील ग्रामीण संस्कृती दाखवण्यात आली होती; मात्र विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पर्यावरणाचा संदेश देणारा ग्रीन बूथ उभारला जाणार आहे. वनविभागाच्या मदतीने ही संकल्पना राबवली जाणार आहे. या ठिकाणी चित्ता, हरिण व हिरवीगार झाडी उभारली जाणार आहेत. पर्यावरणाशी संबंधित माहितीदेखील या उपक्रमाच्या माध्यमातून मतदारांना दिली जाणार आहे.**

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in
बुधवार दि. २० नोव्हेंबर, २०२४





(छायाचित्र- समीर मालोरे)



● अलिबाग विधानसभा मतदार संघातील निवडणुकीसाठी नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलातून मतदान साहित्य मतदान केंद्रावर नेण्यात आले. यावेळी या संघातील मतदान साहित्य आणि कर्मचारी मतदान केंद्रावर नेण्यासाठी इको गाड्या आणि एसटी बसची व्यवस्था करण्यात आली होती.

# आचारसंहितेच्या कालावधीत मुद्देमाल जप्तींची कारवाई

**महिन्याभरात २७ कोटींचा मुद्देमाल जप्त**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात आचारसंहितेच्या कालावधीत करण्यात आलेल्या जप्तीच्या कारवाईत आतापर्यंत एकूण २७ कोटी ४३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गेल्या वेळेच्या तुलनेत यावेळी जवळपास साडेतीन पटीने अधिक मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सोमवारी (दि.१८) जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे.

आचारसंहितेच्या कालावधीत बेकायदेशीर दारू, शस्त्र, अमली पदार्थ यांसह मौल्यवान धातूच्या वाहतुकीचा सुळसुळाट सुरू होता. कोणत्याही आर्थिक प्रलोभनाशिवाय निवडणुका पार पाडल्या जाव्यात यासाठी रायगड पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली होती. यामध्ये हा मुद्देमाल सापडला आहे. सापडलेल्या मुद्देमालात ४८ लाख रुपयांची रोख रक्कम पनवेल, कर्जत, उरण आणि पेण मतदारसंघात सापडली आहे. याच कालावधीत दोन बंदुका व एक गावठी कट्टा जप्त करण्यात आला आहे. तर अलिबाग, महाड आणि श्रीवर्धन मतदारसंघात पैशांची वाहतूक करण्याचा एकही प्रकार आढळून आला नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघात ७३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्याकडून मतदारांना प्रलोभन दाखवण्यासाठी पैशाचा वापर होण्याची शक्यता पाहून रायगड पोलिसांनी वेगवेगळ्या उपाययोजना राबवल्या होत्या. १५ ऑक्टोबर रोजी आचारसंहिता सुरू झाल्यापासून १८ नोव्हेंबरपर्यंत विविध ठिकाणी छापे टाकून हा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आचारसंहिता लागू असल्याने विविध अंमलबजावणी यंत्रणांकडून बेहिशोबी मुद्देमाल जप्तीची कारवाई सुरू आहे. त्यात बेहिशोबी रोकड, दारू, ड्रग्स आणि मौल्यवान धातूंच्या वस्तूंचा समावेश आहे. जिल्ह्यातून या कालावधीत १ कोटी रुपयांची दारू, ६ कोटी रुपयांचे अमली पदार्थ, ५ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू जप्त करण्यात आले आहेत.

**जप्त केलेला मुद्देमाल**

| | |
|---|---|
| मद्यसाठा | १ कोटी ६७ लाख |
| अमली पदार्थ | ६ कोटी ९७ लाख |
| मौल्यवान धातू | ५ कोटी २० लाख |
| इतर वस्तू | १३ कोटी १० |



**मुद्देमाल सापडलेले मतदारसंघ**

- पनवेल – १३ कोटी ८५ लाख
- कर्जत – ११ कोटी १२ लाख
- उरण– ६ लाख ८२ हजार
- पेण – ३५ लाख ८८ हजार
- अलिबाग– २२ लाख ४० हजार
- श्रीवर्धन – ३७ लाख ७१ हजार
- महाड – ६ लाख ८२ हजार

एकूण – २७ कोटी ४३ हजार

## परहूरमध्ये महाविकास आघाडीची सभा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग, मुरूड व रोहा विधानसभा मतदारसंघात परहूर ग्रामपंचायत हद्दीतील महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांची सभा शनिवारी (दि.१६) जांभूळपाडा येथील वसंत नारायण पाटील यांच्या घरी संपन्न झाली. यावेळी सभेला संबोधित करताना महाविकास आघाडी पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी सांगितले की, विरोधी पक्षातले नेते व कार्यकर्ते दारू मटणाची अमिशे दाखवून मतदारांना भुलवत आहेत. दारुमुळे अनेक संसार उध्वस्त होत आहेत. अशा या समाजकंटकांना घरी बसवा आणि आपले संसार वाचावा, असे आवाहन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी महिलांना संबोधताना केले आहे.

या सभेच्या कार्यकर्त्यांनी पूर्ण पंचायत विभागात बाईक रॅली काढत ताईंच्या विजयाचे रणशिंग फुंकले होते. तसेच, चिऊताईंना भरघोस मताधिक्याने निवडून आणू, असे आश्वासन देखील कार्यकर्त्यांनी दिले. यावेळी काँग्रेस नेते सुनील थळे, चंद्रकांत मोकल, शिवसेना प्रवक्ते धंनजय गुरव, शेकापचे ॲड. गौतम पाटील, माजी सरपंच जनार्दन घरत, विनोद खोपकर, प्रकाश पाटील, तुषार नाईक, अक्षय पाटील, परेश गुंजाळ, विकास पाटील, चंद्रकांत पाटील, शेखर पाशीलकर, रवींद्र घोगले, शेकाप पुरोगामी युवक संघटनेचे सदस्य निलेश घरत आदी उपस्थित होते. या सभेचे नियोजन ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील आणी जांभूळपाडा ग्रामस्थांनी केले होते.

## चिऊताईंना उत्स्फूर्तपणे पाठिंबा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग विधानसभा मतदार संघातील मविआ पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना आगरी सामाजिक संस्था अलिबागकडून शुभाशिर्वाद देण्यात आले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची मंगळवारी (दि.१९) सदिच्छा भेट घेतली.

मविआ पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई निवडणूकीच्या रिंगणात उभ्या राहिल्या आहेत. त्यांना राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी वेगवेगळ्या संस्था संघटनांकडून पाठींबा देण्यात आला. या वाढत्या प्रतिसादामुळे चिऊताई यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, आगरी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष कैलास पिंगळे व पदाधिकारी यांनी चित्रलेखा पाटील यांची मंगळवारी सदिच्छा भेट घेतली. त्यांना निवडणूकीसाठी शुभ आशिर्वाद देण्यात आले. यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी उपस्थितांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे व आगरी सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते.

## चिऊताईंना मताधिक्य देणार : संदीप पालकर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग विधानसभा मतदार संघातील मतदान बुधवारी (दि.२०) होत आहे. अलिबाग विधानसभेच्या महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना मताधिक्य देणार, असा विश्वास शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातील अलिबाग शहर प्रमुख संदीप पालकर यांनी व्यक्त केला आहे. तसेच, चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून शेकापसह महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) आदींनी पाठींबा दर्शविला आहे. तसेच, प्रचार सभा, बैठका, रॅलीतून सहभाग नोंदविला आहे. यावेळी गद्दारी करणाऱ्यांना जागा दाखविण्यासाठी शिवसेनेचे सर्व कार्यकर्ते या निवडणूकीत पूर्ण ताकदीनीशी मैदानात उतरले असल्याचे देखील संदीप पालकर यांनी सांगितले आहे.

## ज्येष्ठ नेत्यांकडून प्रीतम म्हात्रेंचे कौतुक

**। उरण । प्रतिनिधी ।**




धार्मिक कार्य ते सामाजिक, शैक्षणिक कार्यात प्रीतम म्हात्रे यांचा सिंहाचा वाटा आहे. प्रीतम म्हात्रे यांचे सामाजिक कार्य उरण, पनवेल, खालापूर, रायगड परिसरातील नागरिकांना माहिती आहे. कोरोना काळात केलेली मदत तसेच इर्शाळवाडी दुर्घटनाग्रस्त जनतेला दिलेला दिलासा हे येथील जनतेने पाहिलेले आहे. प्रीतम म्हात्रे यांची तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात क्रेझ दिसून आली. त्यांनी येथील बेरोजगारीचा प्रश्न हाती घेतला आहे. यामुळे उरण विधानसभा मतदारसंघात शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या शिट्टीचा आवाज जोरदार घुमणार आणि प्रचंड मतांनी निवडून येतील, असे जेष्ठ कार्यकर्ते तसेच तरुण वर्ग सांगत आहे. दरम्यान, प्रीतम म्हात्रे यांचा प्रचार दौरा, रॅली व सभेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. शेकापने तालुक्यातील गावागावात केलेल्या विकास कामांच्या जोरावर प्रीतम म्हात्रे हे प्रचंड मतांनी निवडून येतील याबद्दल तीळ मात्र शंका नाही. प्रीतम म्हात्रे हे सामान्य जनतेच्या मनातील उमेदवार आहेत. उरण मतदार संघात तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्याचप्रमाणे उपजिल्हा रुग्णालय, पायाभूत सुविधा, वाहतूक कोंडीमुळे होणारे अपघात, नौदलाच्या सेफ्टी झोन, जेएनपीए विस्थापित हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन आदी प्रश्न स्थानिक व भूमिपुत्रांच्या जिव्हाळ्याचे आहेत. तसेच, उरण मतदार संघातील दोन्ही उमेदवारांपेक्षा प्रीतम म्हात्रे यांचे सामाजिक काम मोठे असून ते प्रचंड मतांनी निवडून येतील, असे शेकापचे ज्येष्ठ नेते अनिल शिंदे यांनी सांगितले आहे.

## विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

**। तळा । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीसाठी तळा प्रशासन सज्ज झाले असून श्रीवर्धन मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रशासनातर्फे तालुक्यातील ५५ ठिकाणी मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. या मतदान केंद्रावरील मतदान मशिनसह इतर साहित्य अधिकारी वर्गाच्या उपस्थितीत सील करण्यात आली. तालुक्यात विधानसभेसाठी मतदान करणाऱ्या नागरिकांची संख्या ३७ हजार ६१५ एवढी असून यामध्ये पुरुष मतदार संख्या १८ हजार ६५१ तर स्त्री मतदार संख्या १८ हजार ९६४ एवढी आहे. तळा प्रशासनातर्फे दिव्यांगांनी देखील आपल्या मतदानाचा हक्क बजावावा यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये दिव्यांगाना घरूनच मतदान, मतदान केंद्रावर व्हीलचेअरची व्यवस्था, रॅम रेलिंग जाण्या-येण्याची वाहन व्यवस्था, तसेच दिव्यांगांना स्वयंसेवक, मदतनीस इत्यादी सोय करण्यात आली आहे. तालुक्यातील एकही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनातर्फे युद्धपातळीवर तयारी करण्यात आली असून तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन देखील तळा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**■ तळा तालुक्यात ५५ ठिकाणी मतदान केंद्र**



● बुधवारी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मुरूडमधील कोळी बांधवांनी मच्छ राजपुरी खाडीत आपल्या बोटी नांगरून ठेवल्या आहेत.

(छायाचित्र : सुधीर नाझरे)

## जिल्हाधिकाऱ्यांकडून मतदान केंद्राची पाहणी

**रायगड** : विधानसभा निवडणूकीकरीता जिल्ह्यातील सात मतदारसंघामध्ये २४ लाख ८८ हजार ७८८ इतके मतदार असून एकूण २ हजार ८२० मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली असून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मतदानकेंद्राची पाहणी करुन तयारीचा आढावा घेतला. तसेच, अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## खासगी ट्रॅव्हलर्सकडून मतदारांची लूट

**। रायगड । वार्ताहर ।**



महाराष्ट्रात विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला सार्वत्रिक निवडणूक होत असल्याने स्वत:चा मतदानाचा हक्क बजावण्यासाठी हजारो मतदार आपल्या गावी जात आहेत. मात्र, या संधीचा अनुचित लाभ उठवत खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून अव्वाच्या-सव्वा प्रवास भाडे आकारून मतदारांची अक्षरश: लुटमार चालू केली आहे. मतदार हे आपल्या क्षेत्रात जाऊन मतदान करू नये म्हणून खासगी ट्रव्हल्सवाले एकप्रकारे खोडा घालत आहेत की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या संदर्भात अनेक नागरिकांनी तक्रार करून आम्हाला कळवले आहे. तरी निवडणूक आयोगाने खाजगी ट्रव्हल्स कंपन्यांवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करून मतदारांना दिलासा द्यावा, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक अभिषेक मुरुकटे यांनी केली आहे.

सुराज्य अभियानाच्यावतीने आवश्यक ते पुराव्यासह देऊन कठोर कारवाई मागणी एका निवेदनाद्वारे निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. दिवाळीनंतर ५००-७०० रुपये असलेले मुंबई-कोल्हापूर मार्गावरील तिकिटांचे दर १९ आणि २० नोव्हेंबरसाठी जवळपास दुपटीने १ हजार ते १ हजार ६०० रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहेत. विशेषत: ऑनलाईन तिकिट प्लॅटफॉर्मवरही अशीच भरमसाठ लुटमार चालू आहे. केवळ मुंबई-कोल्हापूर, रत्नागिरी, संभाजीनगर या ठिकाणीच नव्हे, अनेक महत्त्वाच्या मार्गांवरील प्रवासभाडे सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. या भाडेवाढीमुळे मतदारांना त्यांच्या मूळ गावी जाऊन मतदान करण्यासाठी मोठा आर्थिक भुर्दंड बसत आहे, असेही मुरुकुटे यांनी सांगितले आहे.

## राज्यात चार दिवस मद्यविक्री बंद

**। कोलाड । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक आठवड्यांपासून सुरु असलेले आरोप, प्रत्यारोप, बैठका, रोड शो, जाहीर सभा या सर्वांना ब्रेक लागला असुन याबरोबरच आता चार दिवसांसाठी ड्राय डे म्हणून पाळण्यात येणार आहे. सोमवारी (दि.१८) प्रचार संपल्यानंतर सायंकाळी ६ वाजल्यापासून मद्य विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी मतदानाच्या दिवशी म्हणजेच बुधवार दि.२० नोव्हेंबरपर्यंत असणार आहे. त्याचप्रमाणे मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच शनिवारी (दि.२३) सायंकाळी ६ वाजेपर्यंत मद्य विक्री बंदी असणार आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर अथवा एखाद्या व्यक्तीकडे विनापरवाना मद्य विक्रीसाठा आढळून आला तर त्याच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येणार आहे. यामुळे तळीरामांचे वांदे झाले असल्याचे बोलले जात आहे.

**फलकातून मतदान करण्याचे आवाहन**


## बेलोशी ग्रामसेवकाच्या संकल्पनेचे कौतुक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. यावेळी मतदान जनजागृती करण्यासाठी अलिबाग तालुक्यातील बेलोशीचे ग्रामसेवक शैलेश नाईक यांनी एक आगळा वेगळा उपक्रम राबविला आहे. त्यांनी मतदान केंद्राच्या परिसरात व गावागावात मतदान करण्याचे फलक लावून 'मतदानासाठी वेळ काढा, आपआपली जबाबदारी पार पाडा', असे मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**



मतदानाचा टक्का वाढविण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात




आले असून वेगवेगळे उपक्रम राबवून मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यावेळी अलिबाग तालुक्यातील बेलोशी ग्रामपंचायत हद्दीत महाजने, बेलोशी, वावे, मल्याण, घोटवडे, वळवली या गावांसह दिवीवाडी, बौध्दवाडी, मठवाडी, पाटवाडी, सागवाडी आदी वाड्यांचा समावेश आहे. यावेळी बेलोशी येथील ग्रामसेवक शैलेश नाईक यांनी गावागावात व मतदान केंद्रापासून काही अंतरावर कागदी फलक लावली आहेत. त्यावर मतदान करण्याचे आवाहन करून त्यांनी मतदान जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे ग्रामसेवकांनी केलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतूक करण्यात येत आहे.

> वरिष्ठांच्या सुचनेनुसार मतदान जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. मतदानाचा टक्का वाढावा, तसेच मतदानाचे महत्व मतदारांपर्यंत पोहचविण्याचा एक वेगळा प्रयत्न केला आहे.
>
> - शैलेश नाईक, ग्रामविकास अधिकारी, बेलोशी ग्रामपंचायत

# ....तो अदानी सेफ है

राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदींच्या एक है तो सेफ है या घोषणेच्या फुग्याला चांगलीच टाचणी लावली आहे. प्रचाराच्या अखेरच्या दिवशी राहुल यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. मोदी और शिंदे है तो अदानी सेफ है असा या घोषणेचा खरा अर्थ आहे. धारावीच्या पुनर्विकासाचा मुद्दा राहुल यांनी प्रचारात एकदम केंद्रस्थानी आणला. धारावीची एक लाख कोटीची जमीन अदानीच्या घशात घालण्यासाठीच भाजपचे सर्व कारस्थान चालू आहे असा आरोप वारंवार झालेला आहे. सत्तेवर आल्यास अदानीचे कंत्राट रद्द केले जाईल असे उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले आहे. हा प्रश्न केवळ धारावीचा नाही. गरिबांचे हक्क, न्याय आणि मुंबईच्या पर्यावरणाचा देखील आहे. धारावीत शेकडो प्रकारचे विविध लघु वा मध्यम उद्योग चालतात. धारावीचे बहुतांश लोक याच ठिकाणी काम करतात. अनेकांचे तर दुकान आणि मकान एकच आहे अशी स्थिती आहे. चामड्याच्या वस्तू, कपडे शिलाई, खाद्यपदार्थ, प्लास्टिकच्या वस्तू, भंगारवर पुन्हा प्रक्रिया करून केल्या जाणाऱ्या वस्तू असे अनेक उद्योग येथे चालतात. इंग्रजीत ज्याला इनफॉर्मल सेक्टर किंवा मराठीत असंघटित क्षेत्र म्हणतात त्या उद्योगांचे मोठे केंद्र धारावी आहे. सर्व जाती, धर्म व भाषांचे लोक येथे राहतात. एकेकाळी ही वस्ती गरीब होती. आता त्यात सर्व स्तरांमधील लोक वास्तव्य करतात. मुंबईत लाखो लोक दूर उपनगरात राहतात. रोज दोन ते तीन तासांचा प्रवास करून कामाच्या ठिकाणी जातात. धारावीत असे होत नाही. राहणे आणि रोजगार एकत्रच आहे. यांची ताटातूट झाली तर त्याने सर्व लोकांचे अर्थचक्र बिघडणार आहे. वेळ आणि पैसा अधिक जाणार आहे. धारावीचे पुनर्वसन करताना या गोष्टीचे भान ठेवणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, शेकडो वर्षांपासून ही एक गलिच्छ मानली गेलेली वस्ती होती. आता हा भाग मुंबईच्या मध्यभागी आल्याने त्याला सोन्याच्या वरताण भाव आला आहे.

## सर्व मुंबईकरांचा प्रश्न

या सोन्यावरच अदानीचा डोळा आहे. घरे बांधणे हा काही अदानीचा मूळ धंदा नाही. तरीही तो यात उतरला आहे. यामध्ये इतर निविदांना डावलून सरकारने त्याला प्राधान्य दिले आहे. शिवाय त्याला अनेक सवलतीही दिल्या आहेत. ठाकरे सरकारने मेट्रो रेल्वेच्या यार्डासाठी कांजूरमार्गाची जागा निश्चित केली तेव्हा त्याला खोडा घालण्यात आला. ती जागा मिठागराची किंवा केंद्र सरकारची होती. तिला केंद्राने परवानगी दिली नाही. आता मात्र अदानीच्या फायद्यासाठी हीच नव्हे तर बोरीवली आणि देवनारची जमीनही खुली केली आहे. लोकांच्या तिजोरीवरचा हा दिवसाढवळ्या घातला जात असलेला दरोडा आहे. मोदी सरकारच्या काळात सर्व महत्वाची बंदरे, विमानतळ, ऊर्जा प्रकल्प अदानीला दिले गेले आहेत. बांगलादेशाला वीज पुरवण्यासाठी अदानीने प्रकल्प उभारला. बांगलादेशातील असंतोषानंतर त्या विजेची मागणी बंद झाली. तर अदानीच्या फायद्यासाठी ही वीज देशात वळवण्याचा निर्णय झाला. धारावीत हेच घडते आहे. अदानीच्या फायद्यासाठी सरकार त्याला हवा तसा कायदा वाकवून देत आहे. यासाठी बऱ्याच चलाख्या करण्यात आल्या आहेत. पुनर्विकासासाठी जी कंपनी स्थापन करण्यात आली आहे तिच्यात ऐंशी टक्के मालकी अदानीची आणि वीस टक्के राज्य सरकारची आहे. लोकांना त्यांच्या जागा खाली करायला लावणे, पोलिस वापरून दडपशाही करणे यासाठी सरकार मालक असण्याचा उपयोग होणार आहे. म्हणजेच अदानीला सेफ करण्यासाठी सरकार आपली यंत्रणा वापरणार आहे. शिवाय, यामुळे लोकांमध्ये कोणाचे पुनर्वसन कुठे करायचे वगैरेंमध्ये राजकारण आणि भ्रष्टाचार करायला भाजप आणि शिंदे गटासाठी अवसर राहील. धारावीतील कायदेशीर रहिवाशांचे तेथेच पुनर्वसन होणार आहे. पण लाखो लोक असेही आहेत की जे झोपड्यांमध्ये वरच्या मजल्यावर राहतात. त्यांना पुनर्वसनातून वगळले आहे. त्यांना दूर उपनगरात भाड्याची घरे दिली जाणार आहेत. याखेरीज धारावीतील प्रदूषणकारी उद्योग इतरत्र हलवले जाणार आहेत. यामुळे आता धारावीचा विकास हा सर्व मुंबईकरांचाच प्रश्न बनला आहे.

## राहुलची भूमिका हीच आशा

वास्तविक यामध्ये जनतेला विश्वासात घेऊन सरकारनेच हा प्रकल्प करणे योग्य ठरले असते. बांधकामाची कंत्राटे खासगी मंडळींना देता येऊ शकतात. म्हाडा किंवा एमएमआरडीएसारख्या संस्थांवर देखरेख ठेवून हा प्रकल्प राबवणे शक्य होते. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे अशाच रीतीने झाला आहे. मात्र सरकारला अदानीची धन करण्यात अधिक रस आहे. राज्यात इतरत्र हेच चालू आहे. समृध्दी प्रकल्पामध्ये अशाच काही कंत्राटांचे भले झाले. विविध शहरांमध्ये जे मेट्रो प्रकल्प राबवले जात आहेत त्यांची गरज किती आहे याचा विचार होत नाही. विकास म्हणजे मेट्रो असे समीकरण बनवण्यात आले आहे. पुणे किंवा नागपूरच्या मेट्रोचा उपयोग एकूण खर्चाच्या मानाने खूप मर्यादित आहे. मुंबईची पहिली मेट्रो दिवाळ्यात आहे. नवीन मेट्रो अजिबात लोकांच्या सोयीच्या नाहीत. आपल्या काळात महाराष्ट्रात किती प्रकल्प आले याची आकडेवारी देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. टेल्को, किर्लोस्कर, कल्याणी, बजाज अशांसारख्यांचे प्रकल्प खूप पूर्वापार मुंबईत आहेत. महाराष्ट्रात मुंबई आहे. चांगले मनुष्यबळ आहे. त्यामुळे प्रकल्प येत राहतात. पण अलिकडे अनेक प्रकल्प डोळ्यादेखत गुजरातला पळवून नेले गेले. नरेंद्र मोदी व शाह यांनी महाराष्ट्राचे खच्चीकरण करण्याची एकही संधी सोडलेली नाही. आर्थिकदृष्ट्या महाराष्ट्राला बरबाद केले जात आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार आपल्या तात्कालिक फायद्यासाठी या महाराष्ट्रद्रोही लोकांना सामील झाले आहेत आणि त्यालाच विकास म्हणत आहेत. शिंदे ज्या बाळासाहेबांचे नाव सांगतात त्यांनी अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतानाही काही मुद्द्यांवर स्पष्ट विरोधी भूमिका घेतली होती. शरद पवार यांनीही काँग्रेसमध्ये राहून देखील गरज पडेल तेव्हा शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्राच्या बाजूची भूमिका घेतली होती. याउलट शिंदे व अजितदादा दिल्लीच्या कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे नाचत आहेत. धारावीचा प्रकल्प म्हणजे लग्न अदानीचे, फायदा मोदींचा, पण धावपळ शिंद्यांची असा सगळा प्रकार आहे. याविरोधात राहुल यांनी घेतलेली ठाम भूमिका हाच आजच्या राजकारणातील आशेचा किरण आहे.

विचार

# उत्साहाचा आल्हाददायक काळ

***दिवाळीचे दिवे शांत झाले असले तरी पुढचा बराच काळ उजळलेला आसमंत अनुभवास मिळणार आहे. हवेतील वाढता गारवा, लग्नसराईची सुरूवात असल्याने घरांपासून बाजारापर्यंत बघायला मिळणारा उल्हास, पर्यटनास अनुकूल काळाची मजा लुटत बाहेर पडणाऱ्यांचे जत्थे, शाळांमध्ये रंगणारी संमेलने, वैचारिक आणि कलात्मक वृत्तीची मशागत करणारे महोत्सव हे सर्वच विषय आगामी काळ आल्हाददायक करणारे आहेत.***

सणासुदीने पुरेपुर भरलेला, उत्सवी काळ सरुन नियमित दिनचर्या सुरू झाली असली तरी हा उत्साहात तीळमात्र खंड पडू न देणारा काळ आहे. हो, आता थंडीचे दिवस सुरू झाले आहेत. हवाहवासा वाटणारा गारवा जाणवू लागला आहे. पावसाची जोरदार बॅटिंग संपल्यानंतर यंदा थंडीची इनिंगही चांगली रंगण्याचा अंदाज व्यक्त होतोय. त्याचबरोबर लग्नसराई सुरू झाल्यामुळे लगबग काही संपणारी नाही. तेव्हा ताजेपणा टिकवून ठेवणाऱ्या या काळाचे सहर्ष स्वागत करायलाच हवे.

प्रत्येक ऋतूतील निसर्गसौंदर्य न्याहाळणे, त्यातील वैशिष्ट्ये अनुभवणे आणि त्यानुसार जगण्याच्या शैलीत फरक करणे ही नेहमीच आनंददायी बाब असते. या अर्थाने बघता आताचा काळही संपन्नतेच्या खुणा दिमाखात मिरवणारा आहे. सृष्टीवर पसरलेली सोनेरी झाक ऐश्वर्यसंपन्न दिसतीये. शेताशिवारात पिकं तयार आहेत. गारवा वाढत असल्यामुळे उठल्यानंतर जमिनीवर पाय टेकवताच अंगभर शिरशिरी येते आणि थंडीची ही लहर नसानसांपर्यंत पोहोचते. बाहेर डोकावून पाहिले असता धुक्याचा दाट थर अगदी खिडकीलगत पोहोचलेला दिसतो. अगदी फर्लांगभर लांबही नजर जाऊ नये इतके दाट हे धुके. सध्या वातावरणातील नानाविध प्रदुषणांमुळे अशा घातक घटकांचे मलीन थर पाहण्याची आपल्याला सवय झाली आहे. मात्र थंडीच्या सुरूवातीला दिसणारे दाट धुके मनाला सुखावून जाते. पानापानांवर गारठलेले दवबिंदू अवतरलेल्या थंडीची साक्ष देतात. या दाट दुलईला भेदून काही चुकार किरणे जमिनीपर्यंत पोहोचतात पण ती कमालीची क्षीण असतात. प्रखरता, उष्णता हे शब्दही त्यांच्या आसपास फिरु शकत नाहीत. अगदी डोक्यावर आलेल्या सूर्याचीही प्रखरता जाणवू नये असे हे दिवस. वातावरणात असा बदल जाणवू लागला की हवाहव्याशा काळाच्या आगमनाने मन सुखावते. पूर्वी दिवाळीच्या सुमारासच कडाक्याची थंडी असायची. पण आता ती थोड्या विलंबाने अवतरते इतकेच. खेरीज तिचे बस्तान बसेपर्यंत दुपारी बऱ्यापैकी उष्माही जाणवतो. मात्र संध्याकाळ पुन्हा एकदा आल्हाददायक होते आणि हिवाळ्याच्या या रम्य काळाचा आनंद घेत, गरमागरम जेवणावर ताव मारत जीव हरवून जातो. वातावरणातील हा बदल आरोग्याला उपकारक असतो. हा गारवा कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी मदत करतो. या वातावरणात पचनसंस्था साथ देत असल्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते. बाजारामध्ये मिळणाऱ्या ताज्या- रसरशीत भाज्या, रसदार फळे आहारातील रुची वाढवतात. पौष्टिक पदार्थ पोटात गेल्याने कांतीवर तेज दिसू लागते आणि आरोग्याचे धन गवसल्याने वृत्ती आनंदी होतात. म्हणूनच हिवाळा हा अनेकांचा आवडता काळ असतो.

**स्वाती पेशवे**

थंडीमधला माहोलच उत्सवी असतो. दिवाळी साजरी झाली असली तरी फटाक्यांचा वास वातावरणात दरवळत असतो. नव्या कपड्यांची सळसळ कानात घुमत असते. त्यात खास थंडीसाठी म्हणून झालेली स्टाईलिश, ऊबदार कपड्यांची खरेदी आनंदात भर घालत असते. रंगीबेरंगी मफलर, आकर्षक आणि डॅशिंग लूक देणारी जॅकेट्स, शानदार शॉल्स, स्वेटर्स, स्टोल्स आदींच्या वापरामुळे आपला लूकच बदलून जातो. थंडीपासून बचाव करणारी ही ऊबदार प्रावरणे व्यक्तिमत्त्वालाही अनोखी झळाळी देतात. हा बदल अगदी हवाहवासा वाटतो. त्यातच लग्नसराईची लगबग मिसळते आणि बहार उडते. हिवाळ्यातील लग्नकार्ये ही तर अनोखी पर्वणीच ठरते. उन्हाळ्याच्या किचकिचाटात साजऱ्या होणाऱ्या लग्नसमारंभांपेक्षा हिवाळ्यात साजरे होणारे लग्नसमारंभ विशेष खुमासदार ठरतात. आल्हाददायक वातावरणात जमणारी मंडळी समारंभाचा निवांतपणे आनंद लुटू शकतात. म्हणूनच हे दिवस विशेष आनंद देऊन जातात.

आपल्या आरोग्यशास्त्राने हिवाळ्यासाठी खास आहार सांगितला आहे. त्याचे पालन केल्यास वाढत्या थंडीचा त्रास होण्याची तीळमात्र शक्यता उरत नाही. गरमागरम सूप, पानात पडणारी गरम पोळी अथवा भाकरी, या दिवसात आवर्जून केली जाणारी बाजरीची भाकरी, तिळाचा कूट वापरुन तयार होणारे रुचकर आणि खमंग पदार्थ, ताटाची डावी बाजू सजवणारी सॅलेड्स, चटकदार उसळी, अन्य तळलेले पदार्थ या सर्वांमुळे थंडीतील भोजनाला एक वेगळीच चव मिळते. एरवी फारसे केले न जाणारे काही पदार्थ खास थंडीतच केले जातात. त्यामुळे जिभेची रुची वाढली नाही तरच नवल. साधी कढी ती काय, पण थंडीत खिचडीसवे गरमागरम कढीची चव अशी काही अफलातून लागते की पोट भरले तरी मन भरत नाही. गरम असो वा तिखट, सगळेच पदार्थ या दिवसात विशेष रुचकर लागतात. थंडी रंगीन आहे. तो रंगांचा महोत्सव आहे. उन्हाळ्यात गडद रंग फारसे खुलून दिसत नाहीत. पावसाळ्यात सगळेच रंग मातकत भासतात, पण थंडीत प्रत्येक रंगाचा सन्मान होतो. कुठलाही भडक कपडा अंगावर छान खुलतो. तो मिरवताना संकोच वाटत नाही. हा रंगांचा महोत्सव लग्नाच्या मंडपात सजतो, फिरायला बाहेर पडणाऱ्या भटक्यांच्या अंगावर शोभतो, गॅदरिंगच्या निमित्ताने स्टेजवर मिरवणाऱ्या लहानग्यांच्या शरीरावर झळकतो आणि या दिवसात पार पडणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना होणाऱ्या गर्दीतही झळकतो. रंगांची ही नक्षी, हे सामर्थ्य चित्तवृत्तीवर सकारात्मक परिणाम केल्याशिवाय रहात नाही.

थंडी आणि व्यायाम हे ही नित्याचे समीकरण आहे. एक प्रकारे हा शारीरिक श्रमासाठी, व्यायामासाठी प्रोत्साहित करणारा काळ आहे, असेही आपण म्हणू शकतो. आता कडक उन्हाची तलखी नाही की पावसाची रिपरिप नाही. घामाची नकोशी चिकचिक नाही की विचित्र प्रकारचा दाटलेला कोंदटपणा नाही. अशा मोकळ्याढाकळ्या वातावरणात व्यायाम करण्याचा आनंदच काही वेगळा. विशेष म्हणजे दिवस लहान आणि रात्र मोठी असल्याने शरीराला पुरेशी विश्रांती मिळते. ऊबदार दुलईत शांत झोप मिळते आणि सकाळी शरीर प्रसन्न मनाने व्यायामाला सिद्ध होते. मनाची तयारी नसताना शरीराची साथ मिळवणे हे खूप अवघड काम आहे. पण थंडीमध्ये मनाची अवस्था चांगली रहात असल्यामुळे शरीराची ऊर्जा टिकून राहण्यास मदत होते हा मुख्य फायदा आहे. म्हणूनच थंडी हा अनेकांचा मनपसंत ऋतू ठरतो.

एकूणच दिवाळीनंतरचे हे दिवस तणावरहित अवस्थेची अनुभूती देतात. कुठल्याही कार्यक्रमामध्ये मध्यंतर असतो ना, तसा असतो हा काळ. हिंदीत एक छान शब्द आहे, ठहराव... थबकणे. पुढच्या वेगवान प्रवासासाठी हे थबकणे गरजेचे असते. सतत वेगावर स्वार होऊन केलेल्या प्रवासात काही काळासाठी मंदावलेला वेग एक प्रकारचा निवांतपणा देऊन जातो. या निवांतपणात खूप काही साधता येते. या दिवसात रंगणाऱ्या, बौद्धिक भूक भागवणाऱ्या कार्यक्रमांचा आस्वाद घेता येतो, सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी झोडता येते, वैचारिक कार्यक्रमांना उपस्थित राहून मेंदूची क्षमता वाढवता येते, मुलाबाळांच्या गॅदरिंगचा आनंद अनुभवताना हळूच गतकाळाच्या कुशीत शिरता येते. कुटुंबिय अथवा मित्र-मैत्रिणींबरोबर सहलीचा आनंद उपभोगता येतो. हा बदल मनस्वी आनंद देणारा आहे. रुटीनमधून बाहेर काढणारा आहे. स्वत:साठी जगण्याची प्रेरणा देणारा आहे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे या ऋतूमध्ये निसर्गात होणारा बदल अनुभवणे हा देखील एक अपूर्व आनंद ठरतो. हे दिवस पानगळीचे. थंडीमध्ये बहुसंख्य वृक्षांची पानगळ सुरू होते. रस्त्यावरुन चालताना पानांचा तळाशी विसावलेला तो ढीग चुरचूर वाजतो. काही छोटी छोटी पिवळी पाने हलकेच आपल्यावर वृष्टी करतात. रस्त्याच्या दुतर्फा, टेकड्यांवर, रानात सगळीकडे पानांचा हा निस्तेज पसारा बघायला मिळतो. हलकीशी झुळूक आली तरी एकीकडचा ढीग दुसरीकडे विसावतो. हे दृश्यही सुखावून जाते. दुसरीकडे, या दिवसात कुंद, कागडा पानोपानी फुलतात. पाने कमी आणि फुले जास्त अशी त्यांची अवस्था होऊन जाते. अबोलीची मंद छटा लुभावून टाकते. माळावर तिळाच्या केशरी फुलांची रांगोळी सजते. तृणपात्यांवर वेगवेगळे तुरे डोलू लागतात. ते पाहताना डोळे सुखावतात. सृष्टीचे हे पालटलेले रूप एकंदरच वेगळी प्रसन्नता देणारे आहे. नवेपणा, ताजेपणा देणारे आहे. हे दिवस नव्या वर्षाकडे घेऊन जाणारे... एका वर्षाची अखेर करणारे... काही काळातच नव्या वर्षाचे आगमन होईल. मात्र त्याची तयारी याच काळात सुरू होते. हे दिवस नवपरिणित जोडप्यांच्या डोळ्यात स्वप्नांची रांगोळी रेखणारे असतात. प्रतिभावंतांची प्रतिभा जागवणतात आणि कलाकारांच्या सर्जनशीलतेला साद देतात. म्हणूनच ते सुखद, सुमंगल आणि लाघवी आहेत. तेव्हा नेहमीच्या धबडग्यातून बाहेर पडत थोडे विसावू या. या सुंदर काळाचा आनंद लुटू या.

आजकाल

# अदानीचा फायदा- बाकीचे उद्योजक गप्प का?

**संजीव चांदोरकर**

देशात एवढे उद्योजक, औद्योगिक घराणी असताना ''अदानी''च का याचे उत्तर गेल्या दहा वर्षात अगदी शाळेतल्या मुलाला देखील कळले आहे.

पण देशात एवढी जमीन असताना मुंबईच का? आणि मुंबईत एवढी जमीन असताना धारावीच का?

महायुतीच्या साऱ्या जाहिराती लाडकी बहीण, विद्यावेतन इत्यादी बाबत आहेत; कारण त्यातून मतदारांना डायरेक्ट अपील करता येते.

खरी चर्चा झाली पाहिजे या सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या राजकीय अर्थव्यवस्था विषयक/आर्थिक धोरणात्मक निर्णयांची.

यातून आधीचा सत्ता बदल नेमका कशासाठी झाला; आपण खोके/पेट्या म्हणतो त्या नेमक्या कोठून आल्या असतील याचे काही अंदाज बांधता येतात.

अलिकडेच बाहेर आलेल्या बातम्यांनी सर्वांच्या मनातील संदेहाला पुष्टी दिली की अडीच वर्षांपूर्वी महाराष्ट्रात अचानक झालेल्या सत्ताबदलामागे राजकीय अर्थव्यवस्थेचा काय अजेंडा होता: तो होता मुंबईतील धारावी मधील जमिनीवर अदानी समूहाचा मालकी हक्क प्रस्थपित करण्याचा.

अदानीसाठी नियमावलीत केलेले बदल, अदानीसाठी टीडीआर, हस्तानंतरणीय विकास हक्क नियमात केलेले बदल, मुंबईतील मिठागरांच्या जमिनी हस्तांतरित करण्याचे प्रस्ताव त्याला पुष्टी देतात.

मुंबईतील जमिनीचे भाव देशातीलच नाही तर जगातील टॉप रियल इस्टेट मार्केट मध्ये झळाळत असतात.

आपण फक्त आजच्या बाजार भावाबद्दल बोलतो. पण गुंतवणूकदार एखाद्या जमिनीत कोट्यवधी रुपये घालतो त्यावेळी तो विकत घेतलेल्या जमिनीचे भाव भविष्यात किती वधारतील याचा अभ्यास करतो; नाहीतर त्याला जमीन खरेदीत काय रस?

आणि मुंबईतील जमिनीचे भाव भविष्यात वाढणार आहेत,

त्याचसाठी देशातील हाय नेटवर्थ व्यक्ती असूदेत, रियल इस्टेट इन्वेजस्टमेन्ट ट्रस्ट असूदेत नाहीतर जागतिक भांडवल गेली काही वर्षे हजारो कोटी रुपयांचे भांडवल मुंबईच्या रियल इस्टेट मध्ये ओतत आहे.

अदानी एक फ्रंट आहे. त्याच्या कंपन्यात हजारो कोटी रुपये ओतणारे कॉर्पोरेट/प्रायव्हेट इक्विटी/आणि अनेक प्रकारचे फंड आहेत, भविष्यात असणार आहेत.

अदानी आणि भांडवलाचे गुंतवणूकदार पैसे आणतील, पण ते शासनांवर किमान दोन गोष्टींसाठी अवलंबून आहेत.

एक : विविध परवानग्या, लागणाऱ्या इतर जमिनी (उदा. मिठागरे )

दोन : जो काही सामाजिक/राजकीय असंतोष तयार होईल, त्याला दंडसत्ता वापरून शमवणे.

यासाठी महाराष्ट्रात कोण सत्तेत असणार हा कळीचा मुद्दा आहे, निर्णायक मुद्दा आहे.

जाता जाता : मला नेहमी एका गोष्टीचे आश्चर्य वाटत आले आहे.

क्रोनी मार्गाने अदानीच्या खिश्यात एवढे काही जात असताना, डायरेक्ट तोटा कोणाचा होत असेल तर त्या त्या उद्योगातील स्पर्धक कॉर्पोरेटचा, खाद्यतेल, सिमेंट, विमानतळ, बंदरे, वीज निर्मिती व वितरण आणि रियल इस्टेट किती तरी क्षेत्रे घ्या.

जो धंदा अदानी समूहाला मिळाला त्यामुळे आपल्याला किमान संधी देखील दिली गेली नाही याबद्दल एकही स्पर्धक कॉर्पोरेट साधा निषेध देखील नोंदवत नाही!

आणि स्पर्धेवर आधारित खाजगी क्षेत्राचे गोडवे गाणारे सुटेड बुटेड नवउदारमतवादी घालून बसतात, अशावेळी देशातील घटनेने स्थापन केलेल्या स्वायत्त संस्थांचा पिंजऱ्यातला पोपट कसा केला गेला आहे हे सारा देश बघत आहे.

आता रिझर्व बँक ऑफ इंडियाची मौद्रिक धोरणे (मॉनिटरी पॉलिसी). ज्यात प्रामुख्याने पैशाचा पुरवठा आणि व्याजदर ठरवले जातात. ठरवण्याची स्वायत्तता धोकात येणार असे दिसत आहे.

आधी आर्थिक पाहणी अहवालात, रिझर्व बँकेने व्याजदर ठरवताना सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील अन्नधान्य, तेल, डाळी, भाजीपाला यांच्या किमती विचारात घेऊ नयेत असा अशी मांडणी केली गेली.

त्यानंतर देशातील अनेक थिंक टँकस, ओपिनियन मेकर्स, विशेषतः इकॉनॉमिक डेलीज आणि वेब पोर्टल वरती लिहिणारे, याची थेरी मांडू लागले.

काही दिवसापूर्वी व्यापार मंत्री पियुष गोयल यांनी रिझर्व बँकेने व्याजदरात कपात करावी अशी मागणी केली . काल मुंबईत बोलताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्याजदर कपात झाली पाहिजे असे भाषणात सांगितले.

मुद्दा व्याजदर तेच ठेवावेत, का त्यात कपात करावी का ते वाढवावेत हा नाहीये.

मुद्दा आहे केंद्रीय बँक म्हणून रिझर्व बँकेला असणाऱ्या स्वायत्ततेचा.

रिझर्व बँकेवर डिसेंबरमध्ये होणाऱ्या धोरणात्मक बैठकीत व्याजदर कपातीसाठी प्रचंड दडपण आणले जात हे उघड आहे.

अमेरिकेचे केंद्रीय बँकेचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांची डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष पदावरती निवडून आल्यानंतर झालेली मुलाखत बघा.

कोट्यावधी सामान्य लोकांच्या दैनंदिन आयुष्याची गुणवत्ता ठरवणारे हे विषय सोशल मीडिया व असंख्य सार्वजनिक व्यासपीठांवर कधी चर्चिले जायला लागतील तो सुदिन!

ज्या प्रमाणात या विषयांवरती देशात चर्चा होऊ लागतील त्या प्रमाणात देशातील विघटनकारी शक्तींचा प्रभाव कमी होत जाईल.

लोकसंसद

## चला, मतदान करूया!

आज २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राच्या पंधराव्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदान होत आहे. आपल्या देशाच्या लोकशाही राज्यव्यवस्थेत मतदान हा प्रत्येक नागरिकांचा हक्क आणि कर्तव्य असून प्रत्येक पात्र मतदार नागरिकांने या दिवशी उत्स्फूर्तपणे, मुक्तपणे व निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावणे महत्वाचे आहे. मतदानाच्या माध्यमातूनच लोकशाहीची प्रक्रिया सुदृढ व समृद्ध होत असते व अशा सुदृढ व सक्षम लोकशाहीमुळे देशाच्या विकासाला वेग प्राप्त होतो. त्यामुळे राज्यघटनेने दिलेल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करून विधानसभेसाठी आपण आपला सुयोग्य लोकप्रतिनिधी निवडणे गरजेचे आहे. आपले एक मत एखाद्या चांगल्या उमेदवाराच्या निवडीसाठी महत्वाचे ठरू शकते. त्यामुळे चला, राज्य आणि राष्ट्र उभारणीसाठी मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडू या! मतदान केंद्रावर गेल्यावर होणारा गोंधळ टाळण्यासाठी मतदारांनी मतदानासाठी जाताना सोबत स्वतःचे छायाचित्र असलेली अधिकृत मतदार स्लिप न विसरता घेऊन जावी. तसेच निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या, निवडणूक मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक तथा टपाल कार्यालयाचे पासबुक, भारतीय पारपत्र, राज्य तथा केंद्रीय कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, दिव्यांग व्यक्ती ओळखपत्र, वाहन चालक परवाना इत्यादी १२ पुराव्यांपैकी कोणतेही एक ओळखपत्र पुरावा म्हणून सोबत असणे गरजेचे आहे.

-प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२० नोव्हेंबर**

**१८५४ :-** रोज एक कविता, याप्रमाणे आयुष्यभरात दहा ते १२ हजार कविता लिहिणारे कवी, निबंधकार व नाटककार मोरो गणेश लोंढे यांचा जन्म. दहा पुस्तके व 'दुर्देवी सून' हे सामाजिक नाटक त्यांच्या नावावर आहे. याशिवाय त्यांच्या आठ नऊ हजार कविता अजुनही अप्रकाशित आहे. त्यांनी मराठी 'बालवाङ्मयातील काव्यविभाग समृध्द केला. 'बोधशतक', 'उपदेशमाला', 'बोधामृत', 'बोषसुधा', 'संगीतसुधा', 'पुष्पगुच्छ', 'पुष्पावली' यासारखी छोटी पुस्तके लिहिली. **१८७७ :-** भारत बांधव समाजाचे संस्थापक आणि महाराष्ट्र वृत्तपत्राचे एक संस्थापक सदस्य दादासाहेब परांजपे यांचा जन्म. **१९०० :-** नाटक, कादंबरी, चरित्र, काव्य, स्थलवर्णन आदी साहित्यप्रकार हाताळणारे लेखक व्यंकटेश विष्णू वैद्य यांचा जन्म. ह्यांनी 'स्वातंत्र्यवीर' या पुस्तकातून शीख देशभक्तांची चरित्रे, अविचारांचा परिणाम' ही कादंबरी, 'संगीत स्वार्थत्याग' हे नाटक', 'गोमांतक विजय' ही छत्रपती संभाजीवर बेतलेली साहित्यकृती आणि 'कुलदेवी श्री म्हाळसा-चा इतिहास' अशी ग्रंथसंपदा. १९०९ : लेखक, ज्ञानेश्वरीचे अभ्यासक महादेव शंकर गोडबोले यांचा जन्म. 'अनुभवामृत प्रसाद', 'चांगदेव पासष्टी', 'भगवद्गीता व ज्ञानदेव', 'संपूर्ण ज्ञानेश्वरी' आदी ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. **१९२०** :- लेखिका इंदूमती श्रीकृष्ण गंधे यांचा जन्म. ह्यांचा 'अर्चिस' हा काव्यसंग्रह. 'नारी' ही सियारामशरण गुप्त यांचा कादंबरीचा अनुवाद 'माझे सौंगडी' ही बालगीते अशी साहित्य संपदा. **१९२७ :-** न्यायमुर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा जन्म. **१९३० :-** लेखक, पत्रकार, संतसाहित्याचे अभ्यासक गजानन शंकर खोले यांचा जन्म. ह्यांनी 'संत कान्होपात्रा, उमाजी नाईक, दै. सकाळचे संस्थापक, संपादक डॉ. परुळेकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आदींची चरित्रे लिहिली. तसेच 'घडविले तयांनी माऊल्यांनी' ह्यातून पती निधनानंतर मुलांना मोठे करणाऱ्या मातांची कथा. 'पाहुण्यांचे पुणे' अर्थात पुणे दर्शन व 'पुण्याची मंडई काल-आज आणि उद्या' तसेच समर्थ रामदासांची पत्रकारिता', 'शिवरायांचा शिवा' ही सिवा काशीद या मावळयाच्या जीवनावरील मुलांसाठीची कादंबरी 'हिमालयातील अमरनाथ' ह्या धार्मिक अशी विपुल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१९३५ : -** लेखक प्राचार्य दामोदर चिंतामण गोखले यांचा जन्म. 'उच्च माध्यामिक पुस्तपालन व लेखाकर्म', 'उच्च माध्यामिक व्यापारशास्त्र परिचय', 'व्यापार-संघटन व रचना', 'व्यापार संघटन व व्यवस्थापन' आदी पाठ्यपुस्तकाचे ते सहलेखक आहेत. **१९३६ : -** मराठी लघुनिबंधाला आपल्या खास वेगळया शैलीने परिणाम देणारे लेखक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचा जन्म. सत्यकथा मासिकातील 'मनातल्या उन्हात' या लेखामुळे रसिक आणि वाचकांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले. 'डोह' ह्या पहिल्या ललितलेख संग्रहातून औदुंबर परिसरातील लोकजीवन, निसर्ग त्यांनी रेखाटला. 'सोन्याचा पिंपळ' या संग्रहात जीवनातील अतींद्रिय व गूढ स्वरुपाचे अनुभव त्यांनी शब्दांकित केले तर 'पाण्याचे पंख' या संग्रहात मुलांचे भावविश्व त्यांनी टिपले. 'कोरडी भिक्षा' या संग्रहात प्राणी, पक्षी आणि सामान्य माणसांच्या माणुसकीचे दर्शन घडवणारे लेखन केले आहे. एकंदरीत त्यांच्या ललित लेखनातून काव्य, चित्रकला आणि उत्कट प्रलयकारी संवदेनांचे आगळेवेगळे दर्शन वाचकांना घडते. **१९५२ :-** पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे अभ्यासक मीमांसक व भाष्यकार शंकर रामचंद्र राजवाडे यांचे निधन. ऋग्वेदातील नासदीय सुक्तांवर त्यांनी चर्तुखंडात्मक भाष्य लिहिलेले आहे. याशिवाय गीताभाष्य अथवा नीतिशास्त्र, अग्निहोत्राचे स्वरुप तसेच आपल्या आत्मचरित्रात त्यांनी त्या काळाचे व्यक्तीचे आणि प्रसंगाचे परखड वर्णन आणि परीक्षण केले आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० नोव्हेंबर

१) श्री.गणेश चिंतामण गोखले
ब्राम्हणआळी, अलिबाग,
२०-११-१९३९

२) श्री.प्रभाकर गोविंद भोईर
अलिबाग, २०-११-१९३५

३)श्री.मधुकर दत्तात्रेय थळकर
मु.पो.नगगाव, अलिबाग
२०-११-१९४६


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**श्री. गणेश भालचंद्र गावडे, वाढदिवस, गोंधळपाडा, अलिबाग**

**श्री. मंदार नारायण गुरव, वाढदिवस, आक्षी, अलिबाग**


# वीटभट्टी व्यवसाय संकटात

## दोन वर्षांत ४२ वीटभट्ट्या बंद

**। श्रीवर्धन । वार्ताहर।**

**सतत बदलणाऱ्या वातावरणामुळे तालुक्यातील वीटभट्टी व्यवसाय संकटात आला आहे. तालुक्यात दोन वर्षांत ६० वीटभट्ट्यांपैकी ४२ वीटभट्ट्या बंद झाल्या आहेत, तर उर्वरित १८ वीटभट्ट्या भुसा, लाकडांचा तुटवडा व मजुरांची कमतरता आदी कारणास्तव बंद होण्याच्या मार्गावर आहेत.**



डोंगरावरील लाल माती किंवा शेतजमिनीमधील काळ्या मातीचा वापर वीट बनवण्याकरिता करण्यात येतो. भट्टीच्या फडात मातीचा ढिगारा करून मजुरांकडून पायाने मळण्यात येते. एकजीव झालेली ओली माती सुकू लागल्यावर मजूर हाताने आयताकार लाकडी साच्यात टाकून विटेचा आकार देतात. ओली वीट साच्यातून काढीत पाच ते सहा दिवस नैसर्गिकरित्या सुकवली जाते. त्यानंतर काही प्रमाणात सुकलेल्या विटांचा भट्टीत थर रचून पोकळीत लाकूड आणि भुशाच्या सहाय्याने भट्टी पेटवण्यात येते. पक्की वीट तयार होण्यास १५ दिवसांचा कालावधी लागतो.

बांधकाम व्यावसायिकांच्या मागणीनुसार, वेगवेगळी लांबी, रुंदी, उंचीप्रमाणे व्यावसायिक विटा तयार करतात. साधारण नोव्हेंबर किंवा डिसेंबरपासून व्यावसायिक वीटभट्ट्या लावण्यास सुरुवात करतात, मात्र यंदा ऑक्टोबरपर्यंत परतीच्या पावसाने मुक्काम केल्याने तयार विटा खराब झाल्या. श्रीवर्धन तालुक्यात दोन-तीन वर्षांपूर्वी एकूण ६० वीटभट्टीत उत्पादन सुरू होते. दिवसेंदिवस मजुरांची कमतरता व भट्टी लावण्यासाठी वापरात येणाऱ्या भुशाच्या तुटवड्यामुळे जवळपास ४२ वीटभट्ट्या बंद झाल्या आहेत. उर्वरित १८ वीटभट्ट्या सुरू असल्या तरी बदलत्या हवामानामुळे त्या अडचणीत आल्या आहेत. अनेक बांधकाम व्यावसायिक विटांऐवजी आता सिमेंटचे ब्लॉक व चिरा दगड वापरत असल्याने विटांची मागणीही तुलनेने कमी झाली आहे. कच्चा माल, मजुरी वगळून फारसे उत्पन्न मिळत नसल्याने वीटभट्टी व्यावसायिक अन्य व्यवसायाकडे वळत आहेत.

### कोंड्याचा (भुसा) तुटवडा

श्रीवर्धन तालुक्यात २०१६-१७ मध्ये भातपिकाचे उत्पादन चांगल्या प्रमाणात होत असल्याने येथील आठ भात गिरण्यांमधून कोंडा मुबलक प्रमाणात मिळायचा. दिवसागणिक भातशेतीचे प्रमाण कमी झाल्याने गिरण्या बंद झाल्या आहेत. सध्या तालुक्यात आठपैकी दोनच भात गिरण्या सुरू आहेत. वीटभट्टी हा सहा महिन्यांचा व्यवसाय असून, या हंगामासाठी एका वीटभट्टी व्यावसायिकाला तीस ते पस्तीस टन कोंडा गरजेचा असतो, परंतु आता कोंडा उपलब्ध होत नसल्याने आणि इतर तालुक्यातील कोंडा आणणे खिशाला परवडत नसल्याने वीटभट्टी व्यावसायिक संकटात आले आहेत.

### मजुरांची कमतरता

एका वीटभट्टीवर १२ जोड्यांची (२४ मजूर) गरज असते. श्रीवर्धन तालुक्यात मजुरांची कमतरता असल्याने तालुक्याबाहेरचे मजूर आणावे लागतात. एका जोडीची दिवसाची मजुरी पंधराशे रुपये असून, सहा महिन्यांचा करार केला जातो. यासाठी बयाणा (आगाऊ रक्कम) द्यावा लागतो. सरकारकडून अपेक्षा नैसर्गिक आपत्तीत शेतकरी, बागायतदारांचे पिकांचे नुकसान झाल्यास सरकारकडून आर्थिक मदत मिळते. वीटभट्टी व्यवसाय साधारण जूनपर्यंत सुरू असतो, मात्र यंदा अवकाळी पाऊस त्यानंतर लांबलेल्या परतीच्या पावसामुळे वीटभट्टी व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कच्चा माल खराब झाल्याने अनेक ठिकाणी अद्याप वीटभट्ट्या लावण्यात आलेल्या नाहीत.

# उरण-करंजा मार्गाची दुरवस्था कायम

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आणि देशातील मोठ्या मच्छिमार बंदराला जोडणाऱ्या उरण ते करंजा मार्गाची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणारे हजारो नागरिक त्रस्त झाले आहेत. या मार्गाचे दुरुस्ती आणि रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून, ते लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहे.



उरण शहर ते करंजा हा चार किलोमीटर लांबीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरून उरण ते अलिबाग हा जलमार्ग आहे. तर नव्याने निर्माण झालेल्या करंजा मच्छिमार बंदरात दररोज अनेक वाहने वाहतूक करीत आहेत. मात्र, मार्गाच्या मधोमध रस्ता खोदण्यात आला आहे. रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी खडी टाकल्याने वाहने त्यात फसून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. अशा प्रकारचा अपघात झाल्याने एका तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या मार्गावरील खड्ड्यांमुळे धुळीचाही त्रास सहन करावा लागत आहे. उरण ते करंजा हा मार्ग जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. मात्र, त्याच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात आले आहे. चार किलोमीटर लांबीच्या या मार्गाच्या रुंदीकरण आणि दुरुस्तीसाठी चार कोटींचा निधी मंजूर झाला असून? त्याचे काम सुरू आहे, अशी माहिती सा.बां. विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली.

## रणछोड देवस्थान मंदिराचा जीर्णोद्धार

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील रणछोड देवस्थान ट्रस्ट यांच्या रणछोड देवस्थान (शनि मंदिर) या मंदिराचा जीर्णोद्धार कार्यक्रम सोमवारी (दि.२५) सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आला आहे. तरी दि.२५ नोव्हेंबरपासून नूतन प्राणप्रतिष्ठापणेपर्यंत मंदिर दर्शनाकरिता भाविकांना बंद ठेवण्यात येईल. तरी भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन रणछोड देवस्थानतर्फे करण्यात आले आहे.

# कर्जाला कंटाळून मनपा अधिकाऱ्याची आत्महत्या

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महानगर पालिकेचे अधिकारी मनोहर गांगुर्डे यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना शनिवारी समोर आली असून, कामोठे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

नवी मुंबई महानगर पालिकेच्या ऐरोली विभाग कार्यालयात प्रशासन अधिकारी म्हणून मनोहर गांगुर्डे हे कार्यरत होते. ते स्वतः कामोठे सेक्टर १६ येथील प्रेमअंबर सोसायटीत राहात होते. त्यांनी शुक्रवारी अपरात्री याच ठिकाणी गळफास घेत आत्महत्या केली आहे. ते दरवाजा उघडत नसल्याचे समोर आल्यावर या बाबत शेजाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिल्यावर पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केल्यावर त्यांनी गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यांना गृहकर्जाची नोटीस आल्याचे आढळून आले. त्यामुळे आर्थिक विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज कामोठे पोलिसांनी व्यक्त केला आहे. सदर आत्महत्या घटनेची नोंद शनिवारी करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियांका खरटमल या करीत आहेत.

# मुंबई-गोवा महामार्गावर धुळीचे साम्राज्य

**। रोहा । वार्ताहर ।**

गणेशोत्सवानंतर मुंबई-गोवा महामार्गाचे काँक्रिटीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. या कामामुळे महामार्गावर सध्या धुळीचे साम्राज्य पसरले आहे. कोलाड बाजारपेठ ते तळवली गावापर्यंत अनेक ठिकाणी काम सुरू असल्याने या धुळीमुळे वाहनचालकांसह नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. धुळीचा त्रास होऊ नये म्हणून पाण्याची फवारणी केली जात आहे. या फवारणीमुळे मात्र रस्त्यावर चिखल निर्माण झाला आहे. या चिखलातून मार्ग काढताना दुचाकी वाहने घसरून अपघाताच्या घटना वाढल्या आहेत.

मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणाचे काम १७ वर्षांपासून सुरू आहे. गणेशोत्सवानंतर या महामार्गाचे काम शीघ्रगतीने सुरू असले तरी या कामात कोणतेही नियोजन दिसून येत नाही. मुंबई-गोवा महामार्गावर कोलाडपासून खांबपर्यंत रस्ता काँक्रिटीकरण, उड्डाण पूल, छोटे-मोठे ब्रिज, गटाराचे काम विविध ठिकाणी सुरू आहे. असे असताना हे काम डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होईल, याची खात्री देता येत नसल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. कोलाड बाजारपेठेत, तसेच तळवली येथील रस्त्यावर प्रचंड धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या धुळीमुळे प्रवासीवर्गाबरोबर स्थानिक व्यापारी व नागरिक बेजार झाले आहेत.

तुफान वेगाने ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यावरील धूळ व्यावसायिकांच्या दुकानात जाऊन मोठे नुकसान होत आहे. याला पर्याय म्हणून ठेकेदाराकडून रस्त्यावर पाणी मारले जात आहे, परंतु या पाण्यामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे, तसेच दोन तासांनी परिस्थिती जैसे थे अशीच होते. त्यामुळे हजारो लीटर पाणीदेखील वाया जात आहे. शिवाय दुचाकींचे अपघातदेखील होत आहेत. त्यामुळे योग्य नियोजनानुसार या धुळीवर उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालकांसह नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## अनिल मुंबईकर यांना मातृशोक

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील आनंदीबाई कृष्णा मुंबईकर यांचे १४ नोव्हेंबर रोजी वृद्धपकाळाने निधन झाले आहे. निधनासमयी त्या ९७



वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. उद्योगपती अनिल मुंबईकर यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात पुत्र अनिल मुंबईकर, पांडुरंग मुंबईकर, रवींद्र मुंबईकर, नातू भावेश मुंबईकर, कन्या कुसुम पाटील, विमल म्हात्रे, शोभा आपटे, सुना, जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि.२३) श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे सकाळी ८.३० वाजता होणार आहेत. तर, उत्तरकार्य विधी सोमवारी (दि.२५) चिरनेर मुळपाडा येथील राहत्या घरी दुपारी १२ वाजता होणार असल्याची माहिती मुंबईकर कुटुंबियांकडून देण्यात आली

# आता पीएच.डी. प्रबंधाला मिळणार पुरस्कार



**। रायगड । प्रतिनिधी ।**

गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने 'पीएच.डी. एक्सलन्स सायटेशन्स' हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत दरवर्षी विविध शाखांतील दहा पीएच.डी. प्रबंधांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार असून, १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीतील प्रबंध विचारात घेतले जाणार आहेत.

गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधकांची दखल घेणे हा या पुरस्काराचा उद्देश आहे. त्यानुसार अभियांत्रिकी, विज्ञान, समाजशास्त्र, भाषा अशा विद्याशाखांतील संशोधन प्रबंध पुरस्कारासाठी निवडले जाणार आहेत. संशोधनाचा अत्युच्च दर्जा दर्शवत ज्ञान, संशोधन पद्धती, स्पष्टता, परिणाम आणि परिणामकारक सादरीकरण हे घटक विचारात घेतले जाणार आहेत. पुरस्कार निवडीसाठीची प्रक्रिया दोन टप्प्यात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर आणि यूजीसी स्तरावर निवड समिती असणार आहे.पीएच.डी. प्रबंधाला पुरस्कार देण्याच्या उपक्रमातून देशातील विद्यापीठांमध्ये केल्या जाणाऱ्या संशोधनाला आणि विविध विद्याशाखांतील संशोधकांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे. प्रत्येक विद्यापीठाला १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या वर्षभराच्या कालावधीत पदवी प्रदान समारंभात पीएच.डी. प्रदान केलेले पाच विद्याशाखांतील पाच प्रबंध पुरस्कारासाठी नामांकित करता येणार आहेत. दरम्यान, पीएच.डी. संशोधनाला पुरस्कार देणे ही चांगली कल्पना आहे. मात्र, त्यासाठीची निवड अत्यंत काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. चांगल्या दर्जाच्या पीएच.डी. संशोधनाला पुरस्कार मिळाल्यास अन्य चांगल्या संशोधकांना प्रोत्साहन मिळेल.

### पीएच.डी. प्रवेशांत वाढ

**यूजीसीने केलेल्या अभ्यासानुसार पीएच.डी. प्रवेशांकडील कल वाढत असल्याचे दिसून आले आहे. २०१०-११ मध्ये ७७ हजार ७९८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी.ला प्रवेश घेतला होता. २०१७-१८ मध्ये १ लाख ६१ हजार ४१२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामुळे आठ वर्षांमध्ये प्रवेश दुपटीने वाढले. पीएच.डी.च्या आकडेवारीचा आढावा घेतला असता विज्ञान शाखेत ३० टक्के, त्यानंतर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखेत २६ टक्के, समाजशास्त्रात १२ टक्के, भारतीय भाषांमध्ये ६ टक्के, व्यवस्थापन आणि शिक्षण या शाखेत ५ टक्के, कृषिशास्त्रात ४ टक्के, वैद्यकीय शाखेत ५ टक्के, वाणिज्य शाखेत ३ टक्के, परदेशी भाषांमध्ये ३ टक्के विद्यार्थी पीएच.डी करत असल्याचे निदर्शनास आले आहे.**

पान १ वरून

## आज मतदान

रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, उरण, पेण, अलिबाग, श्रीवर्धन व महाड या सात विधानसभा मतदारसंघातील दोन हजार ७९० केंद्रांमध्ये २० नोव्हेंबरला सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे. अलिबागसह अन्य मतदारसंघातील नेमणूक केलेले कर्मचारी सकाळपासून मतदान केंद्रात रवाना झाले आहेत. प्रत्येक केंद्रात पोलिसांसह सहा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. सोबत मेडिकल किट व इतर सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. कर्मचारी व साहित्यांची ने-आण करण्यासाठी दोन हजार ८०० वाहनांची व्यवस्था केली आहे. त्यात १२४ मिनीबस आणि जिपचा समावेश आहे. वीस हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांची याठिकाणी नियुक्ती करण्यात आली आहे.

पोलीस सेक्टर पेट्रोलिंगसाठी अतिरिक्त पोलीस बंदोबत नेमण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीसांना सहकार्य करण्यासाठी निवृत पोलीस अधिकारी, वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, आरएसपीचे शिक्षक, एनसीसीचे विद्यार्थी असे रायगड जिल्ह्यात ५७७ विशेष पोलीस अधिकारी असा दर्जा देऊन नेमण्यात आले आहेत. जिल्ह्यात २४ लाख ८८ हजार, ७८८ मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ वयोगटातील ५५ हजार ८९३, ८५ वर्षांपुढील ३५ हजार ८६३, दिव्यांग १३ हजार १९१ तसेच अनिवासी भारतीय २३३ मतदारांचा समावेश आहे.

## शेकापचे खोटे पत्र व्हायरल

पाटील यांनी हे केल्याची दाट शक्यता आहे. या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करुन सखोल चौकशी करण्याची मागणी कार्यालयीन चिटणीस ॲड. राजू कोरडे यांनी केली आहे. याबाबत शेकापच्यावतीने महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक अधिकारी, पेण व उरणचे निवडणूक अधिकारी, अलिबागचे सायबर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस अधिकारी व उरणचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे.

## माथेरान येथील दोन तरुणांचा अपघाती मृत्यू

दुचाकीवरून साजगाव यात्रेसाठी निघाले होते. साजगाव यात्रेत साधारण अकरा वाजेपर्यंत मौजमजा केल्यानंतर हे तरुण पुन्हा माथेरान येथे जाण्यासाठी निघाले. खोपोली शहरातील साजगाव यात्रेतून पुणे-मुंबई महामार्गावरून खालापूरकडे जात होते. दरम्यान, दर्शन वेताळ, प्रथमेश सोनावणे, अजय आखाडे यांची दुचाकी दर्ग्याजवळ टेम्पोवर जाऊन धडकली. हा अपघात रात्री साडेअकरा वाजता झाला आणि काही मिनिटात अपघात ग्रस्तांच्या टीमच्या सदस्यांनी तात्काळ खोपोली नगरपरिषदेची रुग्णवाहिका मागवली. या रुग्णवाहिकेमधून या तिन्ही अपघातग्रस्त तरुणांना पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

उपचार घेत असताना दर्शन वेताळ आणि अजय आखाडे या दोन तरुणांचा मृत्यू झाला असून, प्रथमेश सोनावणे हा अत्यवस्थ आहे. या अपघाताची माहिती रात्रीच माथेरानमध्ये समजली आणि त्यानंतर सर्वत्र शोककळा पसरली आहे. अपघातग्रस्त तिन्ही तरुण हे अल्पवयीन असल्याने त्यांच्याकडे वाहतूक परवानादेखील नव्हता.

## दळवींच्या मनमानीमुळे महायुतीत वाद

वाढत्या प्रतिसादामुळे महेंद्र दळवी यांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याचे चित्र आहे. महायुतीमधील खासदार सुनील तटकरे यांचे चौलमधील समर्थक व काही वर्षांपूर्वी काँग्रेसचे काम करणाऱ्या खानावमधील बड्या नेत्यांवर दळवींनी संताप व्यक्त केला आहे. त्यांच्यावर काम करीत नसल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या मार्गाने तंबी देण्यात आल्याची चर्चा असून, ती जगजाहीर होऊ लागली आहे. दळवींच्या या मनमानी कारभारामुळे महायुतीमधील काही कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दळवींच्या या भूमिकेबाबत अनेकांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत. तसेच अपक्ष उमेदवार दिलीप भोईर यांनीदेखील दळवींवर विश्वास नसल्याचे अनेकवेळा त्यांच्या भाषणातून उदाहरणासहित व्यक्त केले आहे. त्यामुळे दळवींवर या सर्वांच्या रोषाला बळी पडावे लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दळवी विश्वासातील व्यक्ती नसल्याचेही अनेकांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे या निवडणुकीत दळवींना फटका बसणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## खानावमधील पिता-पुत्राला दळवींचा दम?

परंतु, निवडणुकीत मते मिळाली नाही, तर थळमध्ये यायचे नाही, असा दम या नेत्यासह त्याच्या पुत्राला दळवींनी भरल्याची चर्चा खानावमध्ये सुरु आहे. त्यामुळे खानावमधील या पिता-पुत्रांवर आता पश्चातापाची वेळ आली आहे. काँग्रेसमध्ये असतानादेखील एकेकाळी दळवींना सर्व माहिती पुरविण्याचे काम ते करायचे, असा आरोप येथील नागरिक करीत आहेत. मागील दोन वर्षांपूर्वी मल्याण येथील शेतकऱ्यांनी भूसंपादन करण्यास आलेल्या अधिकाऱ्यांविरोधात आंदोलन पुकारले होते. त्या आंदोलनाची इत्यंभूत माहितीदेखील दळवींना बांधावरील कोपऱ्यात नेऊन दिल्याचे येथील मंडळी सांगतात. मात्र, नियती वेळ आल्यावर अद्दल शिकवतेच. ज्या दळवींपुढे हा नेता लोटांगण घालत होता, त्याला आणि त्याच्या पुत्राला त्याच दळवींनी लाथाडल्याची चर्चा असून, चांगलाच दम भरल्याचे बोलले जात आहे.

## कार्यालय बनले श्वानांचे आश्रयस्थान

किती जनहितांची कामे करतो हे बिंबविण्याचा प्रयत्न केला. कारण, काही दिवसांत विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार होता. हा एकप्रकारे मतांचा जोगवा मागण्याचा प्रयत्न होता.

सदर नगरपालिका व इतर कार्यालयाचे लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रम संपन्न झाला होता. त्याला आता दीड ते दोन महिन्याचा अवधी होण्यास येऊनही अद्यापपर्यंत उरण नगरपालिकेचे कार्यालय हे जुन्याच इमारतीमध्ये सुरू आहे. आचारसंहिता लागण्यापूर्वी नवीन वास्तूमध्ये नगरपालिका कार्यालय सुरू होईल, असे कर्मचाऱ्यांना वाटत होते. परंतु, त्यांचा भ्रमनिरास झाला आहे.

सदरचे सर्व बांधकाम ही अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचे समजते. तसेच अनेक कामांचा ठेकेदार ही एकच असल्याची धक्कादायक माहिती आहे. अधिकारी वर्गाकडे याबाबत विचारणा केली असता ते यावर काहीच उत्तर अथवा माहिती देण्यास टाळाटाळ करतात. एवढा येथील राजकीय पक्षाचा दबाव अधिकारी वर्गावर असल्याचे उघड होते.

नगरपालिकेच्या नवीन कार्यालयाचा लोकार्पण सोहळा काही दिवसांपूर्वी होऊनही अद्याप पर्यंत नवीन वास्तूत कार्यालय सुरू झालेले नाही. सदरचे कार्यालय धूळखात पडले असून अद्याप आतील काम अपूर्ण असल्याची माहिती अधिकारी वर्ग देतात. मात्र सदरची नवीन वास्तू ही कुत्र्याची आश्रयस्थान बनली असल्याचे चित्र पहावयास मिळत असल्याने जनतेत नाराजीचा सूर निघत आहे.

## स्विफ्ट गाडीची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

दोन लाख रुपये किमतीच्या स्वीफ्ट गाडीची चोरी झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. आकाश जोसेफ यांनी त्यांची दोन लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी कंपनीची गाडी क्र.एमएच-४६-बीझेड-३८५४ ही घराजवळील साईबाबा मंदिरासमोरील रस्त्यावर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पिस्तुल विक्रीसाठी आलेला तरुण अटकेत

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

दिघा येथील ग्रीन वर्ल्ड इमारतीजवळ पिस्तूल व जिवंत काडतूस घेऊन आलेल्या एकाला गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने शनिवारी सायंकाळी सापळा रचून अटक केली आहे. नितीन बबन पवार असे या आरोपीचे नाव असून, त्याने हे पिस्तूल त्याने कुठून आणले व ते कोणाला विक्री करणार होता, याचा पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

ग्रीन वर्ल्ड इमारतीजवळ एक व्यक्ती शस्त्र घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक संजय रेड्डी व त्यांच्या पथकाने दिघा येथील ग्रीन वर्ल्ड इमारतीजवळ सापाळा रचला. यावेळी आरोपी नितीन पवार हा याठिकाणी संशयास्पदरित्या आला असता, पोलिसांनी त्याला पकडून त्याची झडती घेतली. यावेळी त्याच्याजवळ एक देशी बनावटीचे पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे, मॅगजीन आढळून आले. गुन्हे शाखेने त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

# तिबेटी खंड्याचे फ्लेमिंगो अभयारण्यात दर्शन

**। वाशी । वार्ताहर ।**

हजारो किलोमीटरचा प्रवास करून ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर म्हणजेच तिबेटी खंड्या हा ठाणे खाडीतील फ्लेमिंगो अभयारण्यात आला आहे. यामुळे पक्षीप्रेमी, पक्षी निरीक्षक व छायाचित्रकार आनंदी झाले आहेत. ठाणे खाडी परिसरात फ्लेमिंगो मोठ्या प्रमाणात येत असतात. त्याचप्रमाणे काही दुर्मिळ पक्षीदेखील येतात. नुकतेच फ्लेमिंगो अभयारण्यात दुर्मिळ तिबेटी खंड्या पक्षीप्रेमींना दिसून आला आहे. यामुळे पक्षीप्रेमी व अभ्यासकांसाठी ही पर्वणी आहे, असे कांदळवन विभागाचे आधिकारी प्रशांत बहादुरे यांनी सांगितले.

भारतात किंगफिशर पक्षाच्या एकूण १२ प्रजाती आढळतात. त्यापैकी ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर अर्थात तिबेटी खंड्या हा आकाराने सर्वांत लहान आहे. हा पावसाच्या सुरुवातीला महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीत आढळणारा पक्षी आहे. हा पक्षी सध्या ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये आढळून आला आहे. तिबेटी खंड्याची लांबी १२ सेमी ते १४ सेमी इतकी असते, तसेच नारंगी रंगाची चोच, भेदक काळेभोर डोळे, पिवळे पोट आणि विविध निळ्या रंगछटा असलेले, सुंदर निळ्या रंगाचे ठिपके असलेले पंख आणि डोक्यापासून ते शेपटापर्यंत विविधरंगी छटा यामुळे खंड्या अतिशय सुंदर आणि मनमोहक दिसतो. ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर हा भूतान आणि भारतातील ईशान्य भागात आढळतो.

# निवडणूक कर्मचाऱ्यांची जय्यत तयारी सुरू

## शाळांना एक दिवसाची झळाळी



। रायगड । प्रतिनिधी ।

मतदानासाठी काही तास शिल्लक राहिले असताना निवडणूक कर्मचाऱ्यांसह कार्यकर्त्यांची जय्यत तयारी सुरू झाली आहे. जिल्ह्यातील बहुतांश मतदान केंद्रे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आहेत. किमान मतदानासाठी या शाळांमधील माजी विद्यार्थी येणार असल्याने शाळा परिसर स्वच्छ असावा, यासाठी भर दिला जात आहे, त्याचबरोबर पक्षीय कार्यकर्त्यांची निवडणूक बूथ उभारण्याची लगबग सुरू झाली आहे.

यंदा सरासरीपेक्षा जास्त उमेदवार असल्याने मतदान केंद्राबाहेर आपल्या पक्षाचा निवडणूक बूथ असावा, असा आग्रह प्रत्येक उमेदवार करीत आहे. त्यामुळे आतापासूनच मोक्याच्या ठिकाणी बूथ उभारण्याची तयारी केली जात आहे. हे निवडणूक बूथ कसे असावेत, याबद्दल निवडणूक आयोगाने काही नियम घालून दिले असून त्यांची अंमलबजावणी उमेदवारांना करावी लागणार आहे. जे उमेदवार या आदर्श आचारसंहितेचा भंग करतील, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या आहेत.

### शाळा झाल्या स्वच्छ

बुधवारी होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक कर्मचारी मंगळवारपासून रवाना होण्यास सुरुवात झाली होती. यासाठी शाळा परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात ९० टक्के मतदान जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये होते; परंतु अलीकडे या शाळांची पुरती दैना झालेली दिसते. कमी विद्यार्थी पटसंख्येमुळे अनेक शाळा बंद पडत चालल्या आहेत. एक दिवसाच्या मतदानासाठी या शाळांची स्वच्छता केली करण्यात आली.

### दोनशे मीटर त्रिज्येबाहेर बूथ

२०० मीटर त्रिज्येमध्ये उमेदवारांचे निवडणूक बूथ उभारण्यात येऊ नयेत. एकाच इमारतीत किंवा आवारामध्ये अनेक मतदान केंद्रे असल्यास अशा सर्व मतदान केंद्राकरिता मिळून केवळ एक निवडणूक बूथ प्रत्येक उमेदवाराकरिता २०० मीटर त्रिज्येच्या बाहेर उभारता येईल. निवडणूक बूथ उभारण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी, आवश्यकतेनुसार सरकारी प्राधिकरणे, तसेच स्थानिक प्राधिकरणांच्या परवानग्या घेणे आवश्यक आहे. निवडणूक बूथ उभारल्यामुळे सार्वजनिक किंवा खासगी मालमत्तेचे अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. बूथ धार्मिक जागेमध्ये किंवा परिसरात उभारण्यात येऊ नये, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

### बूथबाबत कडक नियम

मतदान केंद्रे ही सरकारी इमारतीमध्येच लागतात. ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळा या उपलब्ध असल्याने याच ठिकाणी मतदान केंद्रे उभारली जातात. या मतदान केंद्रांच्या बाहेर निवडणूक बूथ कसे असावेत, यासंदर्भात निवडणूक आयोगाने काही नियम घालून दिले आहेत. या नियमांचे उल्लंघन न केल्यास गुन्हे दाखल करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केल्या आहेत.



# मतदार कर्मचाऱ्यांना भत्ता रोखीनेच मिळणार

। रायगड । प्रतिनिधी ।

मतदान प्रक्रियेत भाग घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता तत्काळ मिळावा, यासाठी पोलिंग पर्सोनेल मॅनेजमेंट सिस्टीम या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ऑनलाईन रक्कम पाठवण्यात येणार होती. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये याची चाचपणी सोमवारी (दि.१८) घेण्यात आली. त्यानुसार इतर जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना या सुविधेचा लाभ मिळणार आहे; परंतु रायगड जिल्ह्यात ही यंत्रणा वापरण्यात येणार नसल्याने जिल्ह्यातील १७ हजार ४९७ निवडणूक कर्मचाऱ्यांना सुविधेचा लाभ मिळणार नाही, त्यांना रोखीने भत्ता देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

निवडणुका झाल्यानंतर अनेक दिवस भत्ता मिळाला नसल्याच्या तक्रारी कर्मचाऱ्यांच्या असायच्या. या समस्येवर मात करण्यासाठी ऑनलाइन भत्ता वाटपाची यंत्रणा सुरू करण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाचा आहे. प्रत्येक मतदार केंद्रावर एक केंद्रप्रमुख व इतर चार कर्मचारी काम करतात. या कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता, आहार भत्ता देण्यात येतो. लोकसभा निवडणुकीपर्यंत हा भत्ता रोखीने देण्यात येत होता, मात्र विधानसभा निवडणुकीपासून हा भत्ता ऑनलाइन स्वरूपात देण्याचा निर्णय झाला असून, त्याबाबतचे पत्र उपसचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी के. सूर्यकृष्णमूर्ती यांच्या सहीने राज्यातील सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे.

### जेवणाचा वेगळा भत्ता

निवडणूक प्रक्रियेत प्रत्येक कर्मचाऱ्यांना वेगळा दैनिक भत्ता आहे. या व्यतिरिक्त प्रतिदिन दोन वेळचा जेवण भत्ता १५० रुपयांप्रमाणे मिळतो. प्रशिक्षण काळात जेवणाची व्यवस्था केली जाते. मतदानाच्या दिवशी व आदल्या दिवशीच जेवणाचा भत्ता दिला जातो. ग्रामीण भागात मतदान प्रक्रियेसाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना जेवण देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी गावचे पोलिस पाटील यांच्यावर असते. दोन दिवस जेवण, चहापाणी तयार करून देणाऱ्यास हे कर्मचारी पैसे देतात.



**ऑनलाईन वाटपाची यंत्रणा सुरू करण्याचा प्रयत्न**

**१७ हजार ४९७ निवडणूक कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार**

**मतदान केंद्रातील कार्याचा आढावा**

| पद | भत्ता (रु.) | दिवस |
|---|---|---|
| केंद्राध्यक्ष | ३५० | ४ |
| सहाय्यक केंद्राध्यक्ष | २५० | ४ |
| मतदान अधिकारी | २५० | ४ |
| मतदान अधिकारी | २५० | ४ |
| वर्ग चार कर्मचारी | २०० | २ |
| पोलीस कर्मचारी | २५० | २ |
| आशा कर्मचारी | २०० | १ |
| स्वयंसेवक | २०० | १ |
| सूक्ष्म निरीक्षक | १००० | १ |

> “निवडणूक भत्ता देण्याची सुविधा रायगड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना मिळणार नाही. ही सुविधा उपलब्ध होण्यापूर्वीच कर्मचाऱ्यांच्या बँक खात्याची माहिती बँकांना देण्यात आली आहे. पूर्वीच्याच पद्धतीने त्यांना निवडणूक भत्ता मिळणार आहे. त्याचबरोबर निवडणूक भत्त्यामध्येही बदल झालेले नाहीत.”
>
> – नितीन वाघमारे, निवडणूक अधिकारी



● (छायाचित्र : राजेश डांगळे)



● बुधवारी पार पडत असलेल्या विधानसभा निवडणूकीसाठी अधिकारी आणि कर्मचारी सज्ज झाले असून १८८ पनवेल विधानसभा मतपेट्या मंगळवारी पोलीस संरक्षणातून मतदान केंद्रावर रवाना करण्यात आल्या.





● १८८ पनवेल विधानसभा मतदार संघात कडक पोलीस बंदोबस्त संदर्भात पोलीस अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. गुजरातमधून आलेल्या राखीव दलाला देखील सूचना देण्यात आल्या. आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी पोलीस महिला कर्मचारी देखील सज्ज झाल्या असून एक महिला कर्मचारी आपल्या बाळाला सोबत घेऊन उपस्थित झाली होती.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **गाळा भाड्याने देणे आहे.** पी.एन.पी.मध्ये कलावती भाजी भंडारच्या बाजूला, अलिबाग संपर्क : ७३०४८५२३१५/९६०४१३८८२६
- **सन स्टोन रीयल इस्टेट,** साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- **वर्कशॉमध्ये कामासाठी मुले** पाहिजेत शिक्षण ITI कोणत्याही ट्रेडचा पगार- १२००० /महिना ८ तास ड्युटी संपर्क -९०४९६५५५२३
- **गुरुकृपा क्लासेस इयत्ता प्रि-प्रायमरी** ते ८ वी मराठी/सेमी/ इंग्रजी माध्यम सर्व विषय शिकवले जातील. तसेच पाळणाघराची सोय आहे. संपर्क- ७२१८१५५४४८/९८२३९२०४०३
- **पाहीजे- रिसोर्टवर स्वयंपाक करणे,** वाडीची साफ सफाई करणेसाठी पुरुष/स्त्री/ अनुभवी केअर टेकर पाहीजे. सर्पक:- ८३२९१७५७९१
- **वर्कशॉपमध्ये कामाला मुले** पाहिजेत १० वी १२ वी पास/ नापास पगार-१२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी संपर्क - ९८२३५८५३२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# मतदान जनजागृतीसाठी ‘अभिनव’ शाळा



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत विधानसभा मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध ठिकाणी पथनाट्य सादर केली जात आहेत. कर्जत शहरात अभिनव ज्ञान मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्जत नगरपरिषदेकडून या पथनाट्य कार्यक्रमासाठी प्रोत्साहन देण्यात आले. आपल्या लोकशाही असलेल्या देशात सर्वांनी मताधिकाराचा वापर करून अशा व्यक्तीची निवड करावी की जो देशाच्या विकासासाठी सक्षम असेल आणि देशाची सूत्रे कुशलतेने हाताळू शकेल. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे मत हे खूप मौल्यवान आहे. सरकार बनवण्यात देशातील प्रत्येक मतदाराची भूमिका महत्त्वाची असते तथा सुदृढ लोकशाहीसाठी ते उपयुक्तच आहे. ही भूमिका मतदारांनी योग्यपणे पार पाडाव्यात या अनुषंगानेच प्रशालेतील स्काऊट गाईड विभागाच्यावतीने पथनाट्य सादरीकरण करण्यात आले.



# कर्जत मतदारसंघातील मतदान यंत्र रवाना

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत मतदारसंघात बुधवारी (दि.२०) पार पडणाऱ्या मतदानाची तयारी पूर्ण झाली असून मंगळवारी (दि.१९) सर्व मतदान केंद्रावर मतदानाचे साहित्य पोहचविण्यात आले. यावेळी कर्जत विधानसभा मतदारसंघ ३६२ मतदान केंद्र असून त्यातील तुंगी आणि पेठ अशी दोनच मतदान केंद्र दुर्गम भागात आहेत. त्या दोन ठिकाणी जीप मधून तर अन्य सर्व ठिकाणी बसमधून मतदान यंत्र पोहचवण्यात आले आहे.

बुधवारी पार पडत असलेल्या मतदानासाठी कर्जत मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर मतदान साहित्य देण्यासाठी मंगळवारी (दि.१९) सकाळी आठ वाजल्यापासून लगबग सुरू होती. कर्जत येथील प्रशासकीय भवनाच्या बाजूला असलेल्या पोलीस मैदानात भव्य मंडप घालण्यात आला होता. त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश सकपाळ यांच्यासह सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. धनंजय जाधव, अमोल चव्हाण तसेच दोन्ही तालुक्याचे अधिकारी पोलीस अधिकारी उपस्थित होते.

यावेळी कर्जतमधील ३६५ मतदान केंद्रावर मतपेटी पोहचवण्यासाठी ४७ क्षेत्रीय अधिकारी नेमण्यात आले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर सहा असे एकूण ३६२ मतदान केंद्रावर २ हजार १९० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, चोख पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला आहे. मतदान यंत्र आणि मतदान केंद्राचे अधिकारी कर्मचारी यांना मतदान केंद्र स्थळी नेण्यासाठी निवडणूक आयोगाने एसटी गाड्यांनी सोय केली होती. कर्जत तालुक्यात तुंगी आणि पेठ हे दुर्गम मतदान केंद्र असून त्या ठिकाणी जीप गाडी मधून मतदान यंत्र तसेच साहित्य पाठवण्यात आले. प्रत्येक मतदान केंद्रावर पोलीस कर्मचारी किंवा होम गार्ड कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# मतदान प्रक्रियेसाठी २० हजार कर्मचारी सज्ज

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांसाठी बुधवारी (ता. २०) नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निःपक्ष, निकोप आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. मंगळवारी सकाळपासून निवडणूक कर्मचारी मतदान साहित्य घेऊन केंद्रावर जाण्यास सुरुवात झाली. साधारण २० हजार कर्मचारी मतदान केंद्रांकडे रवाना झाले आहेत.बुधवारी सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदान सुरू राहणार आहे, तसेच शनिवारी (ता. २३) रोजी सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणी सुरू होणार आहे.



जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये २४ लाख ८८ हजार ७८८ इतके मतदार असून, दोन हजार ८२० मतदार केंद्रे आहेत. जिल्ह्यातील मतदारसंघामध्ये १३ हजार १९१ दिव्यांग मतदार असून, दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअर व वाहनाची प्रत्येक मतदान केंद्रावर व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय, ज्येष्ठ नागरिक, गर्भवतींसाठी विश्रांत कक्ष, त्यांना बसण्यासाठी खुर्च्या यासह उन्हात उभ्या राहणाऱ्या मतदारांसाठी मंडप उभारण्यात आले आहे. मतदार माहिती चिठ्ठीचे ९८ टक्के वितरण झाले आहे, त्याचबरोबर आपले मतदान केंद्र कुठे आहे हे शोधण्यासाठी निवडणूक आयोगाने https://electoralsearch.eci.gov.in/ हे संकेतस्थळ उपलब्ध करून दिले आहे. मतदारांना वितरित करण्यात येणाऱ्या मतदार माहिती चिठ्ठीद्वारेदेखील कुठे मतदान करावयाचे आहे ते कळू शकेल.

**७६१ दळणवळणासाठी वाहने**

विधानसभा मतदारसंघनिहाय मतदारांना केंद्रांवर ने-आण करण्याकरिता वाहन व्यवस्था करण्यात येत आहे. त्यामध्ये एसटी बस ३४६, मिनी बस १२४, जीप २९१ अशी एकूण ७६१ वाहने ठेवण्यात आली आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार ईव्हीएम मशीन वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांवर जीपीएस सुविधा उपलब्ध केली आहे.

**अंधांसाठी ब्रेल लिपीतील मतपत्रिका**

अंध मतदारांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी मतदानाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी निवडणूक आयोगाने ईव्हीएम मशीनवरच ब्रेल लिपीतील बटणांची सुविधा देऊ केली आहे. यामुळे अंध मतदारांना मतदान करणे सोपे होईल. या सुविधेमुळे वेळेची बचत होण्याबरोबरच मतदान करणेही अंधांना सोपे जाईल, असे बोलले जात आहे. रायगड जिल्ह्यात १३ हजार १९१ अपंग मतदार आहेत. यातील अंधत्व असलेल्या १,१५३ मतदारांना याचा फायदा होणार आहे.

यापूर्वी अंध मतदारांसाठी ईव्हीएम मशीनच्या बाहेर पिवळ्या रंगाची ब्रेललिपीतील स्टिकरची पट्टी असे. अंध मतदारांनी त्या पट्टीवर हात फिरवल्यानंतर त्यांना मशीनवर कोणत्या नंबरवर कोणत्या पक्षाचे उमेदवार आहेत याची माहिती मिळे व ते मतदान करत, यात बराच वेळ जायचा, मात्र नवीन मशीनमध्ये ब्रेलची सुविधा असल्याने अंध उमेदवारांना थेट मशीनमध्येच उमेदवार तपासून मतदान करता येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

# परतीच्या पावसामुळे पिकाचे नुकसान

**। रसायनी । वार्ताहर ।**

खरिपाच्या हंगामात सिंचनाचा आधार असलेले शेतकरी दुबार भात आणि भाजीपाल्याचे पीक घेतात. यंदाच्या वर्षी खरिपाच्या हंगामात भाताचे पीक चांगले आले होते. त्यामुळे शेतकरी आनंदात होते, मात्र परतीच्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाल्याने शेतकरी हताश झाले आहेत.

परिसरात वासांबे मोहोपाडा, चावणे,आपटे,वडगावपंचक्रोशीतील शेतकरी खरिपाच्या हंगामात भाताचे पीक घेतात, तसेच सिंचनाचा आधार असलेले शेतकरी दुबार भात आणि भाजीपाल्याचेपीकघेतात.खरिपाच्या हंगामासाठी यंदा पाऊस वेळेवर पडला असल्याने परिसरात पेरणी आणि लावणीची कामे वेळेत पूर्ण झाली. शेती पिकांनी बहरली होती, मात्र ऑगस्टमध्ये पावसाने दडी मारली. त्यात काही ठिकाणी खोडकिडीचा प्रादुर्भाव झाला होता. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले होते.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


# रान मांजरांच्या पिल्लांना जीवदान

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील उलवे साई मंदिर येथून मुकेश पाटील यांचा नेचर फ्रेण्ड सोसायटी पनवेल या संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे यांना कॉल आला. त्यांच्या प्लांटवर एक मांजरीचे पिल्लू क्रशर प्लांटच्या तोडलेल्या दगडांमध्ये अडकले आहे आणि ते पिल्लू घरात पाळली जाणाऱ्या मांजरीच्या पिल्लापेक्षा थोडं वेगळं दिसत आहे, असे त्यांना सांगण्यात आले.



संतोष उदरे यांनी लगेच उरण वनपरिमंडळाचे आर.एफ.ओ. विष्णू कोकारे यांना फोन करुन कळविले आणि सहकारी शार्दूल वारंगे यांना घेऊन घटनास्थळी पोहचले. तसेच, उरण वनपरिमंडळाचे भाऊसाहेब संजय पाटीलही घटनास्थळी पोहचले.

यावेळी घटनास्थळी पाहणी केली असता जंगल मांजरीची तीन पिल्ले दगडखाणीत मध्यभागी अडकलेली दिसली. ती पिल्ले दोन-तीन दिवसांपासून तिथे अडकली असल्याने तेथील काम गारांनी दगड तोडण्याचे काम बंद ठेवले होते. आर.एफ.ओ. कोकारे यांच्या मार्गदर्शनानुसार मोठ्या शर्तीने त्या तीन पिल्लांची यशस्वी सुटका करण्यात आली. या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये भाऊसाहेब पाटील, संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे व संस्थेचे शार्दूल वारंगे यांनी महत्वाची भूमिका पार पाडली.

# जोगेश्वरी मंदिरात तुलसी विवाह



**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्याची आराध्य ग्राम देवता श्री जोगश्वरी माता मंदिराच्या प्रांगणात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त तुलसी विवाह सोहळा शुक्रवारी (दि.१५) मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. त्यावेळी यजमान म्हणून उत्सव समितीचे सचिव मंगेश कामथे व त्यांच्या पत्नी यांना पूजेचा मान मिळाला. या तुलसी विवाह सोहळ्याला श्री जोगेश्वरी देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाई टके, बाळासाहेब टके, हरेश काळे, नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि सचिन कुलकर्णी, प्रकाश मोरे, या विवाह सोहळ्याला उपस्थित होते.

# खारघरमध्ये आचारसंहितेचा भंग

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

खारघर सेक्टर-१५मध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने स्पॅगेटी वसाहतीतील मंदिरामध्ये आरतीसाठी जमलेल्या नागरिकांना भाजपच्या उमेदवाराला मत देण्यासंदर्भात आवाहन करत आचारसंहितेचा भंग केल्याचे उघडकीस आले आहे. याबाबतचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर निवडणुक आयोगाच्या भरारी पथकाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन धार्मिक स्थळाचा प्रचारासाठी वापर करणाऱ्या व्यक्तीविरोधात आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

प्रेमकुमार सोनी असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव असून शुक्रवारी (ता. १५) सायंकाळी प्रेमकमार व त्याचे इतर सहकारी स्पॅगेटी वसाहतीतील मंदिरामध्ये आरतीच्यावेळी गेले होते. आरती संपल्यानंतर सोनी याने मंदिरामध्ये जमलेल्या १२ ते १५ महिलांना भाजपच्या उमेदवाराला मत देण्याकरीता आवाहन करुन आचारसंहितेचा भंग केला.

याबाबतचा व्हिडीओ दुसऱ्यादिवशी व्हायरल झाल्यानंतर तो पनवेल विधानसभा मतदारसंघातील आचारसंहिता भरारी पथकाकडे पोहोचला. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या व्हिडीओबाबत खात्री करुन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पथकाने येथील मंदिरामध्ये जाऊन तेथील पुजाऱ्याकडे चौकशी केली भाजपला मतदान करण्यास सांगणारा व्यक्ती प्रेमकुमार सोनी असल्याची माहिती त्याने दिली. त्यानुसार भरारी पथकाचे प्रमुख लक्ष्मण जाधव यांनी वरिष्ठांच्या सुचनेनुसार आचारसंहिता भंग करणाऱ्या विरोधात खारघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी प्रेमकुमार सोनीच्या विरोधात गुन्हा दाखल करुन त्याच्यावर पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

## महिलेला मारहाण

**। पनवेल । वार्ताहर ।**

मागील आठ वर्षांपासून लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहत असताना पुरुष इसमाने सदर महिलेस घरगुती कारणावरुन वाद घालून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा प्रकार उसर्ली गावाच्या हद्दीत घडला आहे. दिप सोसायटी येथे राहणारा इसम हा गेल्या आठ वर्षांपासून एक महिलेसोबत लिव्ह ईन रिलेशनशीपमध्ये राहात असताना घरगुती कारणावरुन वाद घालून तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान, या रागाच्या भरात सदर महिला ही भावाकडे राहण्यास गेली असता तिला परत घरी बोलावून पुन्हा मारहाण करून तिला गंभीर दुखापत केल्याने याबाबतची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नेहरू कलादालनात बालदिशा प्रदर्शन



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बालदिनाचे औचित्य साधून वरळी येथील नेहरू कलादालनात आयोजित करण्यात आलेल्या चित्र प्रदर्शनात पनवेलमधील सायुज्य महामुनीच्या चित्रांची निवड करण्यात आली. सायुज्य महामुनी पनवेलमधील सीकेटी विद्यालयात इयत्ता सहावीमध्ये शिकत आहे. सायुज्यच्या यशाबद्दल पनवेलसह परिसरातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या कलेला वाव मिळण्यासाठी बालदीनाचे औचित्य साधून दरवर्षी वरळी येथील नेहरू कला दालनात १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या चित्रांचे बालदिशा प्रदर्शन भरविण्यात येते. यावर्षी दिनांक १२ ते १८ नोव्हेंबर दरम्यान हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनात राज्य भरातून आलेल्या चित्रांपैकी १६ विद्यार्थ्यांच्या चित्रांची निवड करण्यात आली. यामध्ये पनवेलच्या सायुज्यच्या चित्रांचा समावेश आहे. मागील सात दिवसात कलाक्षेत्रातील विविध मान्यवरांनी तसेच नागरिकांनी या कलादालनास भेट दिली.

## ६ लाखाची फसवणूक

**पनवेल :** रोख रक्कम दिली तर त्या बदल्यात दुप्पटीने रोख रक्कम देईन असे सांगून एका इसमाची ६ लाखाची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नवीन पनवेल येथे राहणाऱ्या तक्रारदार इसमाची दोन आरोपींपैकी एकासोबत मैत्री होती. त्याने माझ्या मित्राला रोख रक्कम दिलीस तर तो दुप्पटीने रोख रक्कम देईल असे त्यांना सांगितले. त्याच्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने त्याच्याजवळ असलेली ६ लाख रुपये रक्कम त्याला दिली. त्या बदल्यात आरोपीने ३ नोटांचे बंडल त्यांना दिले. दिलेल्या बंडलमध्ये वर खाली ५०० च्या खऱ्या नोटा लपवून ठेवल्या होत्या. तर आतमध्ये खेळण्यातील नोटा ठेवण्यात आल्या होत्या. यावेळी फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यानी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## स्वाती पितळे यांचे निधन

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील उद्योजक हर्षल पितळे यांच्या मातोश्री स्वाती शुक्राचार्य पितळे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुली व एक मुलगा, पती शुक्राचार्य व नातवंडे असा परिवार आहे. स्व. स्वाती पितळे या शिक्षिका होत्या. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडविले. दोन्ही मुलींचे, मुलगा हर्षल याचेही लग्न झाले आहे. स्व. स्वाती पितळे यांच्यावर पेण येथील विश्वेश्वर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

**THE REVDANDA**
**CO-OPERATIVE URBAN BANK LTD.**
Revdanda, Dist Raigad. 402 202. PH. 02141-240039 Fax: 02141-240793

Ref. No. RCUB/Rev/ /2023-24 Date: 18/ 11 /2024

**Securitisation Notice U/s 13(2) of SARFAESI Act 2002**

We, The Revdanda Co Op Urban Bank Ltd, Revdanda the secured creditor of Applicant mentioned in column no. 1 & 2 below inform you all tha your account has been classified as Non Performing Account in our accounts on 31 March 2020 pursuant to your defaults in making repayment of Principle and interest an amount of Rs. 10,76,811/- is now due and payable by you as on 31/10/2024 together with further interest thereon to The Revdanda Co Op Urban Bank Ltd Revdanda.

Inspite of our repeated demands you have not paid the amount outstanding in your account and you have not discharged your liabilities. We, therefore issued notice U/s 13(2) of chapter III of the Securitisation and Reconstruction of financial Assets and Enforcement of Security Interest Act 2002 on 08/11/2024 demanding payment of the above mentioned amount together with further interest applicable at contracted rates, costs, charges, other money to discharge your liabilities in full within 60 days from the date of the notice. But you both did not accept the said Register Notice of 08/11/2024

| | |
|---|---|
| 1. Name of Borrower Address | Mr. Chandrakishor Chotelal Jaiswal<br>Room no 4, 1st Floor, Vishwas Sadan, AgarAli<br>AT Post Revdanda, Tal Alibag, Dist Raigad<br>Mrs. Saroj chandrakishor Jaiswal<br>Room no 4, 1st Floor, Vishwas Sadan, AgarAli<br>AT Post Revdanda, Tal Alibag, Dist Raigad |
| 2. Name of Guarantor Address | Mr. Nagesh Ramdhan Tiwari<br>Room no 5, 1st Floor, Vishwas Sadan, AgarAli<br>AT Post Revdanda, Tal Alibag, Dist Raigad<br>Mr. Anil Shankar Gupta<br>Room no 5, "A" Wing 1st Floor, Ganga Aprt,<br>nerar Post office, At Post Tal Roha, Dist Raigad. |
| 3. Description of Immovable Property | Tukdi and District Raigad Pot Tukdi and Taluka Alibag in the area of Sub Ragistrar Alibag Raigad Zilla Parishad, Panchayat Samiti Alibag, Mauje Revdanda the house No.405/4 of 342 sqft owned by Mr. Chandrakishor Chotelal Jaiswal & Mrs. Saroj Chandrakishor Jaiswal in Group Grampanchyat Revdanda and said house no.405/4 is in Mauje Revdanda Room no 4, 1st Floor, Vishwas Sadan, AgarAli AT Post Revdanda, Tal Alibag, Dist Raigad |
| 4. Account No. | 100218160000178 |
| 5. NPA Date | 31 March 2020 |
| 6. Amount Outstanding | Rs.10,76,811/- |
| 7. Amount Outstanding as on | 31/10/2024 |
| 8. Rate of Interest | 13% |

Now the authorized officer of The Revdanda Co-Op Urban Bank Revdanda do hereby publish contents of the above demand notice as provided under Rules for discharge your liabilities in full failing which we shall without any further reference be constrained to enforce the above security created by you in our favour by exercising any or all the rights given under the said Act.

Please note that this Publication is made without prejudice to such rights and remedies as are available to The Revdanda Co Op Urban Bank Ltd Revdanda against the borrower and the guarantors of the said financial under law. You are further requested to note that as per section 13(13) of the said Act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing the above security or transferring by way of sale, lease or otherwise of above Secured asset without our prior written consent.

Date- 18/11/2024
Place - Revdanda

**Authorised Officer**
**The Revdanda Co Op Urban Bank Ltd Revdanda**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे बांगमाडले, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत, सदर वरकस मिळकतीचे विद्यमान मालक सौ. पल्लवी अजय चिटणीस यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित वरकस जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रं. | क्षेत्र- (हे.आर.चौ.मी) | आकार - (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बांगमाडले, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | ३८८ | वरकस ०-३८-००<br>पो.ख. ०-०२-००<br>०-४०-०० | ०.२० |

अलिबाग,
दि. १९/११/२०२४

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
बी.ए.एल.एल.बी.
रितुराज प्लाझा, शिवाजी चौकाजवळ
अलिबाग तळमजला, फ्लॅट नं. १
मो. ०९८५००४२२३४
Email Id :- maheshmhatre7@gmail.com

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे महान, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. नितेश भिमराव कातुर्डे, श्री. सतिश भिमराव कातुर्डे, श्रीमती नितिना भिमराव कातुर्डे, श्रीमती उज्वला भिमराव कातुर्डे, श्री. चंद्रकांत बाबुराम कातुर्डे, राहणार महान, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकतीपैकी ०-२०-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. नितेश भिमराव कातुर्डे, श्री. सतिश भिमराव कातुर्डे, श्रीमती नितिना भिमराव कातुर्डे, श्रीमती उज्वला भिमराव कातुर्डे, श्री. चंद्रकांत बाबुराम कातुर्डे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| महान ता. अलिबाग | ५२/१ | ०-८८-००<br>०-१२-०० पो.ख.<br>१-००-०० एकूण | १-३० |

सदर जमिन मिळकतीपैकी ०-२०-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १९/११/२०२४.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन:- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- बेलोंडाखार ता:- उरण, जि:-रायगड**

| अ. क्र. | सर्व्हे नं | शेतकऱ्याचे नाव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ५७/२ | मयुर तुकाराम मढवी व इतर | ०.०२.५० | ०.३३ |
| | ५६/१ | | ०.०२.३५ | ३.३८ |
| २ | ५७/३ | वैशाली कृष्णा कराळे व इतर | ०.०१.८० | ०.२२ |
| | ५६/१४ | | ०.०२.५० | ०.३७ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसित करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणर नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- २०/११/२०२४
**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं.९०५-९०८, शेल्टॉन क्युँबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई. ४००६१४.

# भारताचे अंतिम फेरीचे लक्ष्य

## जपानशी आज सेमीफायनल



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गतविजेत्या भारतीय महिला हॉकी संघाने साखळी फेरीतील पाचही लढतींमध्ये विजय संपादन करीत अगदी दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला. आता भारतीय महिला संघाला होत असलेल्या अंतिम चार फेरीच्या लढतीत जपानचा सामना करावयाचा आहे. याप्रसंगी भारतीय महिला संघ पाचव्यांदा या स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्यासाठी प्रयत्न करताना दिसेल. जपानच्या संघालाही पाचव्या अंतिम फेरीचे वेध लागले आहेत. सध्याचा फॉर्म बघता भारतीय महिला संघाचे पारडे जड समजले जात आहे.

भारत व जपान या दोन्ही संघांची आशियाई चॅम्पियन्स हॉकी करंडकातील कामगिरी एकसारखीच राहिली आहे. दोन्ही देशांनी प्रत्येकी दोन वेळा या स्पर्धेच्या जेतेपदावर मोहोर उमटवली आहे. तसेच दोन वेळा दोन्ही देशांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आहे. २०११ मध्ये चीनमध्ये झालेल्या स्पर्धेत जपानने भारताला पराभूत करीत तिसरा क्रमांक पटकावला होता. त्यानंतर २०१३मध्ये जपानमध्ये झालेल्या स्पर्धेत यजमान जपान संघाने भारतीय संघावर १-० असा विजय साकारत जेतेपद पटकावले होते. भारतीय महिला संघाने २०२३मधील रांची येथे झालेल्या स्पर्धेत त्या पराभवाची परतफेड केली. जपानवर ४-० असा शानदार विजय संपादन करीत दुसऱ्यांदा या स्पर्धेच्या अजिंक्यपदावर नाव कोरले होते. एकूणच काय तर दोन्ही देशांमध्ये आतापर्यंत अटीतटीची झुंज पाहायला मिळाली आहे.

आशियाई चॅम्पियन्स करंडकातील यंदाच्या मोसमातील पहिल्या दोन लढतींत विजय मिळवला असला तरी भारतीय महिला संघाकडून अव्वल दर्जाचा खेळ होणे बाकी होते. त्यानंतर मात्र भारतीय महिला संघाने थायलंड, चीन व जपान या देशांविरुद्ध उल्लेखनीय कामगिरी केली. दीपिका, प्रीती दुबे, नवनीत कौर, लालरेमसियामी, ब्युटी डुंगडुंग व संगीताकुमारी यांनी आक्रमक फळीत दमदार प्रदर्शन केले. सलीमा टेटे, नेहा गोयल, सुशील चानू, उदीता, वैष्णवी फाळके यांनीही ठसा उमटवला. याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचे ध्येय आता भारतीय महिला संघाने बाळगले असेल.

भारतीय खेळाडूंनी बचावातही संस्मरणीय कामगिरी केल्यामुळे गोलरक्षक सविता व बिच्छू देवी यांच्या खेळाची चाचपणी अद्याप झालेली नाही. हीच भारताची कमकुवत बाजू असणार आहे. मात्र सविता हिच्याकडे अनुभवाची कमतरता नाही. जेव्हा भारतीय संघाला गरज भासेल, तेव्हा ती आपले सर्वोत्तम प्रदर्शन करील अशी अपेक्षा बाळगता येऊ शकणार आहे.

आशियाई चॅम्पियन्स करंडकात आम्ही आमच्या बलस्थानांवर लक्ष केंद्रीत केले. आक्रमण व बचाव या दोन्हीचे योग्य मिश्रण आमच्या खेळामधून दिसू लागले आहे. भारतीय महिला हॉकी संघाची खेळण्याची पद्धत अधोरेखित होत आहे. हेच आम्हाला हवे आहे, असे हरेंद्र सिंग म्हणाले. हरेंद्र सिंग म्हणाले की, महिला संघाने छान खेळ केला आहे. उपांत्य फेरीत जपानकडून कडव्या झुंजीची अपेक्षा असेल. याप्रसंगी मात्र प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाकडे लक्ष देण्यापेक्षा आमच्या खेळाकडे गांभीर्याने बघणार आहोत. आमचा घरचा अभ्यास परिपूर्ण झाला आहे.

## अर्चना दरवडा हिचे कॅरम स्पर्धेत यश

**। पेण । प्रतिनिधी ।**

कांदिवली मुंबई येथे झालेल्या विभागीय कॅरम स्पर्धेत सौ.म.ना.नेने कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी अर्चना काशिराम दरवडा इ. ९वी हिने या स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावून अंबोली सावंतवाडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेस निवड झाल्याबद्दल पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, उपाध्यक्ष संजय कडू, मानद सचिव सुधीर जोशी, कार्याध्यक्ष प्रशांत ओक व संस्थेचे सर्व सन्मा, सदस्य प्रशासकीय अधिकारी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थिनींकडून तिचे कौतुक केले आहे. सदर विद्यार्थिनीला समीर शंकर दिवेकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांना पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.



# स्वरा पाटील हिचा रशियात डंका



**। पेण । प्रतिनिधी ।**

रशियामध्ये आयोजित वर्ल्ड युनिफाइड चॅम्पियनशिप २०२४ मध्ये एका प्रभावी प्रदर्शनात, पेणच्या एन व्ही.जी एजुव्हेंचर फाऊंडेशनच्या कोनाय सन्स शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. एन.व्ही.जी शैक्षणिक संस्थेच्या कोनायसन्स स्कूलची विद्यार्थिनी स्वरा राजेश पाटील हिने गोल्ड मेडल विथ ब्लॅक बेल्ट मिळावत शाळेबरोबर आपल्या पालकांचे नावही मोठे केले आहे.

स्वरा ही मुळ काळेश्री गावची कन्या असून तिचे वडील राजेश पाटील हे सुविख्यात मुद्रांक विक्रेते आहेत. राजेश पाटील उभय पती पत्नीने आपल्या मुलांवर योग्य संस्कार करुन त्यांना त्यांच्या करिअर व खेळ निवडण्याचे स्वातंत्र दिल्यामुळे आज स्वराने परदेशात जाऊन सुवर्णपदक मिळवून पेणचा डंका वाजवला आहे. पुष्कर म्हात्रे, राजवीर देशमुख, दीप गोरीवाले, निखिल नायक, आर्यन यादव, अनुज म्हात्रे, श्लोक दोंदे आणि अनन्या कुमार यांनी प्रत्येकी कांस्यपदक मिळवले आहे. त्यांच्या सोबत मार्गदर्शक आदित्य तेरेदेसाई यांचे मार्गदर्शन ही मोलाचे ठरले. स्वरा व तिच्या सोबतच्या विद्यार्थ्यांनी जे यश मिळवले आहे. त्याबाबत संस्थेचे अध्यक्ष डॉ. मनिष वनगे, मंगेश नेने, डॉ सोनाली वनगे, ज्योती गुरव, प्रकाश गुरव यांनी अभिनंदन केले आहे.

# बॉक्सिंग एशियन स्पर्धेत निसर्गा गवळीने पटकावले सुवर्णपदक



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वंजारपाडा येथे असलेल्या माथेरान व्हॅली स्कूलमधील विद्यार्थिनी निसर्गा गवळी हिने बॉक्सिंग स्पर्धेत मोठे यश संपादन केले आहे. तेथे झालेल्या एशियन स्पर्धेत निसर्गा गवळी हिने सुवर्णपदकाला गवसणी घातली.

गोवा येथे झालेल्या एशियन बॉक्सिंग स्पर्धेत कर्जत तालुक्यातील माथेरान व्हॅली स्कूलमधील निसर्गा गवळी सहभागी झाली होती. गोवा येथील स्पर्धेत इंडीयन बॉक्सिंग टीम मधून सहभागी होताना आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करताना १४ वर्षीय निसर्गा गवळी हिने ७७ किलो वजनी गटात सहभाग घेतला. त्याठिकाणी कंबोडिया देशाची खेळाडू सोबत दोन हात करताना अंतिम फेरीत चार विरुद्ध शून्य यश असे संपादन करीत सुवर्ण पदकाला गवसणी घातली. भारत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गोपा कुमार नाय्यर तसेच उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी अन्य पदाधिकारी आणि मुख्याध्यापिका मृदुला पटेल यांनी अभिनंदन केले आहे.

## नवगावची वेदिका कवळे हिला बॉक्सिंग स्पर्धेत कांस्यपदक



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नुकत्याच मुंबई येथील रिझवी कॉलेज येथे झालेल्या मुंबई युनिव्हर्सिटी बॉक्सिंग स्पर्धेत अलिबाग जेएसएमची कॉलेजची विद्यार्थिनी वेदिका संतोष कवळे नवगाव हिने कांस्य पदक पटकावले. वेदिका ही कराटे ब्लॅक बेल्ट आहे. तसेच गतका मार्शल आर्ट या खेळामध्ये तिची महाराष्ट्र ऑलिम्पिक तर्फे खेलो इंडिया साठी निवड झाली होती. तसेच बेल्ट रेसलिंग या राष्ट्रीय स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवले होते.

वेदिकाने यश संपादन केले त्याबद्दल शिव-ज्योती मित्र मंडळ नवगाव या मंडळाचे सदस्य समीर राऊत, प्रमोद घासे, अरुण कवळे, मधुकर घासे, विलास मोकल, महेंद्र घासे, ओंकार कवळे , उदय पाटील, निखिल कवळे, संदेश राऊत, संतोष कवळे, अनिल पाटील, विकास शेळके, अरुण पाटील, संदीप कवळे, संजय शेळके, वरदान घरत, संजय राऊत, सुनील म्हात्रे, पंकज गावंड, रमेश शेळके, संतोष पाटील गणेश गावंड यांनी अभिनंदन केले.





## सरस्वती मंदिरच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आंतरशालेय खो-खो व लंगडी स्पर्धेचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सरस्वती मंदिर, माहीम आयोजित आंतरशालेय खो-खो व लंगडी स्पर्धा सरस्वती मंदिर शाळेच्या अमृत मोहत्सवी वर्षानिमित्त मोठ्या उत्साहात सुरु होत आहेत. या स्पर्धेत ५ वी ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. स्पर्धा फेडरेशनच्या नियमांनुसार खेळवली जाईल.

मुंबई शहरातील शाळांमधील खो-खो व लंगडी या दोन खेळांसाठी ५ वी ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील, लंगडीसाठी अधिकतम ३५ किलो वजन असलेले विद्यार्थीच भाग घेऊ शकतील याची नोंद घावी.

या स्पर्धेसाठी प्रथम प्रवेशका देणाऱ्या पहिल्या १२ शाळांचाच समावेश केला जाईल.प्रवेशिका देण्याची अंतिम तारीख २२ नोव्हेंबर आहे. शाळांच्या क्रीडा प्रमुखांनी प्रवेशिका दुपारी १२ वाजेपर्यंत द्यावेत. प्रवेशिकासोबत मुख्याध्यापकांचा शिक्का व सही असलेली खेळाडूंची यादी जमा करावी. माहितीसाठी स्पर्धा प्रमुख सिरिल (९९२२९३३६४७) किंवा बंडगर (९९६९०३३०६२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## रत्नागिरी फुटबॉल संघ उपविजेता

**रत्नागिरी :** गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या पुरुष फुटबॉल संघाने मुंबई विद्यापीठ कोकण झोन पुरुष फुटबॉल स्पर्धेचे उपविजेतपद मिळवले. मुंबई विद्यापीठ, मुंबई व कोंकण झोन आणि देवगड येथील एस. एच केळकर आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत गोगटे- जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरीच्या पुरुष फुटबॉल संघाने कोकण झोन पुरुष फुटबॉल स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. या स्पर्धेत पुरुष फुटबॉल संघात तुषार कांबळे, आर्यन जाधव, अनुज पुजारी, निखिल खेत्री, विवेक बेद्रे, आयान बावडे, भूषण जाधव, आश्रय शिंदे, आयुष वेलणकर, अथर्व म्हस्के, मानोजसिंग पुरोहित, मयुरेश पिलणकर, विशाल परीहार, गुरूप्रसाद कोतवडेकर या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले होते. या संघाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## लोणावळा येथील प्रिमियर लीग स्पर्धा

# रायगड दिशा अकॅडमीचे घवघवीत यश !




**। कोर्लई । वार्ताहर ।**

लोणावळा येथे दिशा क्रिकेट अकॅडमी रायगड आणि मास्टर क्रिकेट असोसिएशन, लोणावळा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मायक्रोस्कॅन इन्फोकॉमटेक प्रा.लि. यांच्या सहकार्याने १४ वर्षाखालील २० षटकांची दिशा प्रीमियर लीग पर्व पाहिले ही क्रिकेट स्पर्धा एस.पी.जे. या भव्य मैदानावर खेळवण्यात आली.

या स्पर्धेत अंतिम सामन्यात रायगड दिशा अकॅडमीने ८ गडी ६ षटके २ चेंडू राखून घवघवीत यश मिळविले.

सौराष्ट्र जय शिवराय क्रिकेट अकादमी, स्कायलाईन एक्सिलन्स क्रिकेट अकादमी (कराड), सुप्रीम क्रिकेट अकादमी (मुंबई) येथील जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय संघानी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत दिशा अकॅडमीचा शुभ वाघ याने २६२ धावा काढून उत्कृष्ट फलंदाज ठरला. सुप्रीम क्रिकेट अकॅडमीचा राज म्हामूनकर ४ गडी राखून उत्कृष्ट गोलंदाज, दिशा क्रिकेट अकॅडमीचा आर्यन बंडगर उत्कृष्ट यष्टिरक्षक तर जय शिवराय क्रिकेट अकॅडमीचा प्रिन्स गोस्वामी उत्कृष्ट क्षेत्ररक्षक ठरला.

यात दिशा अकॅडमीचा शुभ वाघने २ गडी राखून २६२ धावा काढल्याने त्याला मालिकावीर देण्यात आले.

या स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज आणि गोलंदाजाला आकर्षक शुज आणि चषक तसेच मालिकेचा मानकरी आकर्षक किट बॅग बक्षीस मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

अलंकार जाधव (कर्णधार), अनिल जाधव यष्टीरक्षक, आर्यन बंडगर, आकाश चौधरी, पियुष इंदलकर, चिन्मय पाटील, नचिकेत बुल्लु, प्रांजल चिपळूणकर, शुभ वाघ, गौरांग गुप्ता, ओम म्हसकर, रिषभ टवाले, पृथ्वीराज जवके तसेच यशवंत नगर श्री छत्रपती शिवाजी नुतन विद्यालयाचा विद्यार्थी नचिकेत बुल्लूनेदेखील मोलाचे योगदान दिले.

## शमी बंगाल संघात खेळणार

**नवी दिल्ली :** सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी बंगाल संघात भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचा समावेश करण्यात आला आहे. दुखापतीतून सावरल्यानंतर शमी तब्बल वर्षभरानंतर रणजी स्पर्धेत मैदानात परतला. बंगालचा पहिला सामना पंजाबशी होणार आहे. यावेळी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये सुदीप घरामी बंगाल संघाचे नेतृत्व करणार आहे. तर रणजी ट्रॉफीमध्ये कर्णधारपद अनुस्तुप मजुमदार यांच्याकडे होते. शमीने मध्य प्रदेशविरुद्ध ७ विकेट घेतल्या होत्या. गेल्या वर्षी एकदिवसीय विश्वचषकादरम्यान शमीला दुखापत झाली होती आणि रणजी ट्रॉफीमध्ये जवळपास वर्षभरानंतर तो मैदानात परतला होता. पुनरागमन करताना त्याने मध्य प्रदेशविरुद्ध पहिल्या डावात चार आणि दुसऱ्या डावात तीन बळी घेतले. या सामन्यानंतर शमीलाही बॉर्डर गावस्कर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियात बोलावले जाईल अशी आशा होती पण तसे झाले नाही.

# गोल्डन गर्ल क्षितिजा मरागजे पुन्हा चमकली



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ६८ वी राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२४-२५ उत्तर प्रदेश येथील गोरखपूर येथे उत्पन्न झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गोल्डन गर्ल क्षितिजा पूजा जगदीश मरागजे हिने सलग दुसऱ्यांदा या राष्ट्रीय स्पर्धेत खेळताना पदकाची कमाई करत राष्ट्रीय पातळीवर पदक तालिकेत महाराष्ट्राचे खाते उघडले आहे.

क्षितिजा मरागजे हिने महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत सलग तीन वेळा सुवर्णपदक जिंकून विक्रम केला आहे. त्याचसोबत राष्ट्रीय स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा पदक मिळवत तिने कांस्य पदकाची कमाई करून नव्या विक्रमाच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली आहे. क्षितिजा ही कारमेल कॉन्व्हेंट स्कूल खोपोलीची विद्यार्थीनी असून राजाराम कुंभार संचलित कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुल खोपोलीची मल्ल आहे. येथे तिला राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, दिवेश पलांडे, विजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सध्या ती राष्ट्रीय खेल प्राधिकरण मुंबई येथे द्रोणाचार्य अवॉर्ड विजेते राजसिंग चिकारा, अमोल यादव, शिल्पी नरसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सराव करत आहे.

क्षितिजा ही कोयना वडवळ-खालापूर येथील कुसावडे गावची रहिवाशी असून ती वयाच्या आठव्या वर्षापासून कुस्तीचा सराव करत आहे. अवघ्या तेरा वर्षाच्या क्षितिजाने भविष्यात देशासाठी पदक जिंकण्याचा मनोदय ठेवून वाटचाल सुरू ठेवली आहे.

## न्यायालयाचा गंभीरला दणका!

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या अडचणी संपताना दिसत नाहीत. न्यूझीलंडविरुद्धची कसोटी मालिका आणि श्रीलंकेविरुद्धची एकदिवसीय मालिका गमावल्यानंतर त्याला टीकेचा सामना करावा लागत आहे. अशात आता दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाने त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. वास्तविक, घर खरेदीदारांसोबत फसवणूक केल्याप्रकरणी माजी क्रिकेटपटूला दोषमुक्त करण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. दंडाधिकारी न्यायालयाने गौतम गंभीरची आरोपातून निर्दोष मुक्तता केली होती. मात्र, दिल्ली उच्च न्यायालयाने या आदेशाला स्थगिती दिली आहे.

## श्रीलंकेने घेतली २-० अशी अभेद्य आघाडी

# सनथ जयसूर्याच्या मार्गदर्शनात श्रीलंकेचा विजयरथ सुसाट



**। श्रीलंका । वृत्तसंस्था ।**

पल्लेकेले येथील पीएलए स्टेडियमवर पावसाने प्रभावित झालेल्या सामन्यात न्यूझीलंडचा तीन गडी राखून पराभव करून ३ सामन्यांच्या वनडे मालिकेत श्रीलंकेने २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे.

कमी धावसंख्येच्या सामन्यात, कुसल मेंडिसने बॅटने आश्चर्यकारक कामगिरी केली आणि संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अशा प्रकारे श्रीलंका संघाचा विजयरथ सनथ जयसूर्याच्या कोचिंगखाली काही महिन्यांपासून सुसाट धावताना दिसत आहे.

**श्रीलंकेने मायदेशात सलग सहावी वनडे मालिका जिंकली**

श्रीलंकेने मायदेशात सलग सहावी द्विपक्षीय वनडे मालिका जिंकली आहे. जुलै २०२१ मध्ये भारताकडून पराभूत झाल्यापासून ते मायदेशात सलग १० मालिकेत अपराजित आहेत. या वर्षी, श्रीलंकेने पाच द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकल्या आहेत, जे केवळ याआधी २०१४ मध्येच साध्य करता आले होते. त्याचबरोबर श्रीलंकेने नो नोव्हेंबर २०१२ पासून न्यूझीलंडविरुद्ध पहिलीच मालिका जिंकली आहे. सनथ जयसूर्याच्या प्रशिक्षणाखाली संघ पूर्णपणे बदलला आहे आणि जुन्या फॉर्ममध्ये परतला आहे.

**न्यूझीलंडविरुद्धची एकदिवसीय मालिका जिंकली.**

श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यात खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पावसाचा परिणाम दिसून आला. त्यामुळे सामना ४७-४७ षटकांचा करण्यात आला. या सामन्यात श्रीलंकेच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. किवी संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला आणि ४५.१ षटकांत २०९ धावांवर गारद झाला.

आता श्रीलंकेला ४७ षटकांत २१० धावांचे लक्ष्य गाठायचे होते, जे त्यांच्या संघाने ४६ षटकांत म्हणजे एक षटक आणि ३ गडी राखून २१० धावा केल्या आणि सामना सहज जिंकला.

श्रीलंकेच्या विजयात कुशल मेंडिसची भूमिका महत्त्वाची होती. त्याच्या ७४ धावांच्या शानदार खेळीमुळे श्रीलंकेने सामना जिंकला. एका टोकाकडून तो एकटाच धावा काढत होता. या खेळीसाठी त्याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

### जयसूर्याच्या प्रशिक्षणाखाली श्रीलंकेची कामगिरी

- भारताविरुद्धची एकदिवसीय मालिका जिंकली.
- इंग्लंडविरुद्धचा कसोटी सामना इंग्लंडमध्ये जिंकला.
- कसोटी मालिकेत न्यूझीलंडचा पराभव केला.
- वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिका जिंकली.
- वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत विजय.
- न्यूझीलंडविरुद्धची टी-२० मालिका अनिर्णित.

## भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेत चेतेश्वर पुजाराची एन्ट्री!



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २२ नोव्हेंबरपासून पर्थ कसोटीने सुरु होत आहे. या सामन्यापूर्वी शुबमन गिलला दुखापत झाल्यानंतर अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजाराला या मालिकेत नवीन जबाबदारी मिळाली आहे. या दौऱ्यासाठी जेव्हा भारतीय संघ जाहीर केला होता, तेव्हा चेतेश्वर पुजाराला या संघात संधी मिळाली नव्हती. त्याने अलीकडच्या काही महिन्यांत काउंटी आणि रणजी ट्रॉफीमध्ये खूप धावा केल्या आहेत. भारताचा स्टार फलंदाज चेतेश्वर पुजाराला बॉर्डर-गावस्कर मालिकेसाठी नवीन जबाबदारी मिळाली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिली कसोटी पर्थ येथे खेळली जाणार आहे. या सामन्यापूर्वी शुबमन गिलला झालेल्या दुखापतीमुळे टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. यानंतर काही तासांनंतर चेतेश्वर पुजाराला नवीन भूमिका मिळाली आहे. या मालिकेत तो समालोचनात हात आजमावताना दिसणार आहे. पुजाराचा या पाच सामन्यांच्या मालिकेत फलंदाज म्हणून समावेश करण्यात आलेला नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)